महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरूद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन : मुंबईसह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, जालना, नाशिक

MHCrimeTimes MAHCrimeTimes 9803386748 maharashtracrimetimes@gmail.com

www.maharashtracrimetimes.com epaper.maharashtracrimetimes.com

मूल्य ₹ २/-

• संपादक : राकेश शंकर गोरे • वर्ष : १७ अंक : ०९ पृष्ठ : ८ मुंबई, मंगळवार ०२ जून २०२६ ते सोमवार ०८ जून २०२६ • POSTAL REG.NO. MCN/157/2026-2028 • PRGI. REG. NO. MAHMAR/2010/33301

# राजकीय सस्पेन्स संपला! विधान परिषदेसाठी महायुती अन् मविआचे उमेदवार निश्चित

**मुंबई (विशाल कारंडे) : राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून १८ जून रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. गेल्या अडीच वर्षांपासून या निवडणुका लागल्या नव्हत्या. त्यामुळे गेल्या अडीच वर्षांपासून या आमदारकीच्या जागा रिक्त आहे. विधान परिषदेच्या एकूण ७८ सदस्य संख्येपैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे निवडून जातात. यंदा सोलापूर, अहमदनगर, ठाणे, जळगाव, नांदेड, सांगली-सातारा, यवतमाळ, पुणे, भंडारा- गोंदिया, नाशिक आणि अमरावतीच्या स्थानिक संस्थेच्या विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक होत आहे.**



दरम्यान, १ जून रोजी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख होती. दुपारी ३ पर्यंत अर्ज भरता येणार होते. या निवडणुकीसाठी अनेकजण उत्सुक होते. त्यामुळे प्रचंड दावे-प्रतिदावे झाले. महायुती आणि महाविकास आघाडीतील अंतर्गत मतभेदही चव्हाट्यावर आले. पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षांतर्गतच बंडाळी झाल्याचं दिसलं. पुण्यातून सुनील टिंगरे आणि विक्रम काकडे या दोघांनीही राष्ट्रवादीच्या तिकिटावर अर्ज भरला आहे. तर, छत्रपती संभाजीनगरमध्ये महायुतीत वाद झाला. या जागेवरून भाजपाने सुहास शिरसाट यांना उमेदवारी दिली आहे, तर शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाच्या समीर सत्तार यांनीही अर्ज भरला आहे. प्रचंड रस्सीखेच आणि दावे-प्रतिदावे झाल्यानंतर महायुतीतून १७ जगांसाठी उमेदवारांची नाव निश्चित झाली आहेत. भाजपा ११, शिवसेना (एकनाथ शिंदे) ४, राष्ट्रवादी (अजित पवार) २ जागांवर निवडणूक लढवणार आहेत. तर महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस ८ जागांवर, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्ष ५ जागांवर आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) तीन जागांवर निवडणूक लढवणार आहे.

### भाजपा उमेदवारांची यादी

- वर्धा चंद्रपूर गडचिरोली- अरुण लखाणी
- भंडारा-गोंदिया- अविनाश ब्राह्मणकर
- अमरावती- प्रवीण पोटे
- सोलापूर- राजेंद्र राऊत
- सांगली सातारा- धैर्यशील कदम
- अहिल्यानगर- प्राजक्त तनपुरे
- छत्रपती संभाजीनगर-जालना- सुहास शिरसाट
- नांदेड – अमर राजूरकर
- धाराशिव बीड लातूर- बसवराज पाटील
- जळगाव- नंदकिशोर महाजन
- नागपूर- राजीव पोतदार

### शिवसेना (एकनाथ शिंदे) उमेदवारांची नावे

- ठाणे- रवींद्र फाटक
- नाशिक- नरेंद्र दराडे
- परभणी-हिंगोली- सईद खान
- यवतमाळ- दुष्यंत चतुर्वेदी

### काँग्रेसच्या उमेदवारांची यादी

- चंद्रपूर-वर्धा-गडचिरोली – शैलेश देशमुख
- अमरावती – हर्षदीप देशमुख
- यवतमाळ – साहेबराव कांबळे
- लातूर – महेश देशमुख
- सोलापूर – आदित्य फत्तेपूरकर
- नागपूर – अतुल लोंढे
- भंडारा-गोंदिया – दिलीप बनसोड, प्रफुल अग्रवाल आणि नरेश ईश्वरकर

- अपक्ष - छत्रपती संभाजीनगर-जालना- समीर सत्तार

### शिवसेनेच्या उमेदवारांची नावे

- नाशिक – अनिल कदम
- परभणी- हिंगोली – डॉ. विवेक नावंदर
- छत्रपती संभाजीनगर – जालना – देवयानी कृष्ण पाटील डोणगावकर
- जळगाव – शरद तायडे
- रायगड-रत्नागिरी- सिंधुदुर्ग – सुरेंद्रनाथ उर्फ बाळ माने
- राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)
- सांगली-सातारा – अनिश्चित
- पुणे- श्रीकांत पाटील
- ठाणे- अभिजीत पवार

### राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) उमेदवारांची नावे


- रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग- अनिकेत तटकरे
- पुणे- विक्रम काकडे आणि सुनील टिंगरे

## ई-बसेससाठी चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश



**मुंबई (राकेश गायकवाड) :** ‘विकसित महाराष्ट्र अंतर्गत’ एसटी महामंडळामध्ये सन २०२९ पर्यंत ५० टक्के, २०३५ पर्यंत ८० टक्के, तर २०४७ पर्यंत एसटीचा १०० टक्के ताफा ई-बसेसमध्ये रूपांतरीत करण्याचा संकल्प राज्य शासनाने सोडला आहे. या अनुषंगाने ई-बसेससाठी आवश्यक असलेले चार्जिंग स्टेशन उभारण्याच्या कामाला गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या ‘वर्षा’ या अधिकृत निवासस्थानी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ई-बसेससंदर्भात एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव संजय सेठी, एसटीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे आणि उपसचिव चेतन निकम आदी मान्यवर उपस्थित होते. ▸ पान २ वर

## मुंबई जल मेट्रोला गती



### पहिली इलेक्ट्रिक हायड्रोफॉइल फेरी मुंबईत दाखल


**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** मुंबईतील महत्त्वाकांक्षी जल मेट्रो प्रकल्पाला वेग मिळाला असून या प्रकल्पासाठीची पहिली कॅन्डेला पी-१२ इलेक्ट्रिक हायड्रोफॉइल फेरी मुंबईत दाखल झाली आहे. २७ मे रोजी आलेली ही अत्याधुनिक बोट सध्या जवाहरलाल नेहरू बंदर (JNPT) येथे असून कस्टम क्लिअरन्सच्या प्रतीक्षेत आहे. मत्स्यव्यवसाय आणि बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी याबाबत माहिती दिली. कस्टम प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या फेरीची विविध तांत्रिक चाचण्या घेतल्या जाणार आहेत. चाचण्यांमध्ये यश मिळाल्यानंतर जल मेट्रो सेवेच्या पुढील टप्प्यांबाबत निर्णय घेतला जाईल. कॅन्डेला पी-१२ ही हाय-स्पीड इलेक्ट्रिक हायड्रोफॉइल फेरी असून ती ताशी सुमारे ४० किलोमीटर वेगाने धावू शकते. एका वेळी ३० प्रवाशांची वाहतूक करण्याची क्षमता या बोटीत आहे. मुंबई जल मेट्रो प्रकल्पासाठी अशा एकूण ११ फेऱ्यांची मागणी करण्यात आली असून जलवाहतुकीचा आधुनिक पर्याय उपलब्ध करून देण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. ▸ पान २ वर

## ‘डाक सेवा गिफ्ट्स’चे मेसेज ठरले खोटे!

### व्हायरल मेसेजवर PIB चा इशारा




**नवी दिल्ली (प्रगती शर्मा) :** व्हाट्सअप आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर इंडिया पोस्टच्या (भारतीय डाक विभाग) नावाखाली फिरणाऱ्या या मेसेजमध्ये दावा केला जात आहे की, इंडिया पोस्टतर्फे नागरिकांना मोफत ‘डाक सेवा गिफ्ट्स’, सबसिडी किंवा लकी ड्रॉद्वारे बक्षीसे दिली जात आहेत. ही बक्षीसे मिळवण्यासाठी युजर्सना एका बाह्य लिंकवर क्लिक करण्यास आणि आपली वैयक्तिक माहिती भरण्यास सांगितले जात आहे. मात्र, हा व्हायरल मेसेज पूर्णपणे खोटा आणि बनावट असून नागरिकांनी अशा कोणत्याही फसव्या लिंक्सवर क्लिक करू नये, असा स्पष्ट इशारा केंद्र सरकारच्या ‘प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो’च्या फॅक्ट चेक युनिटने दिला आहे. ▸ पान २ वर



संपादकीय

संपादक : राकेश शंकर गोरे



## महामुंबईच्या वाहतुकीला जलमेट्रोची नवी दिशा

मुंबई महानगर प्रदेशातील वाढत्या वाहतूक कोंडीवर प्रभावी उपाय म्हणून जलमेट्रो प्रकल्प आकार घेत असून महामुंबईच्या दळणवळण व्यवस्थेत नव्या पर्वाची सुरुवात होत आहे. पहिली इलेक्ट्रिक हायड्रोफोईल फेरीबोट मुंबईत दाखल झाल्यानंतर जलमार्गांवर आधारित सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या उभारणीला गती मिळाली आहे. रस्ते आणि रेल्वे वाहतुकीवरील वाढता ताण कमी करण्यासाठी जलमेट्रो हा महत्त्वाकांक्षी आणि भविष्योन्मुख प्रकल्प मानला जात आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पालघर आणि रायगड या संपूर्ण महानगर प्रदेशाला जोडणारे एकूण २१ जलमार्ग विकसित करण्याची योजना राज्य सरकारने आखली आहे. या प्रकल्पामुळे समुद्री मार्गांचा प्रभावी वापर करून प्रवाशांना जलद, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक वाहतुकीचा पर्याय उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे, कोकण किनारपट्टी आणि मुंबई महानगर प्रदेशातील जलसंपत्तीचा उपयोग करून वाहतूक व्यवस्थेत क्रांतिकारी बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. या प्रकल्पातील पहिली कॅंडेला पी-१२ इलेक्ट्रिक हायड्रोफोईल प्रकारातील अत्याधुनिक बोट मुंबईत दाखल झाली आहे. ही बोट जलविमान कंपनीच्या ताफ्यात समाविष्ट करण्यात आली असून तिची प्राथमिक प्रक्रिया सुरू झाली आहे. बोट दाखल झाल्याची माहिती राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी दिली. आवश्यक सीमाशुल्क प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या बोटीची समुद्रात चाचणी घेण्यात येणार आहे. राज्य सरकारच्या नियोजनानुसार डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जलमेट्रो सेवा सुरू करण्याचा मानस आहे. प्रारंभी काही निवडक मार्गांवर सेवा सुरू करण्यात येईल आणि त्यानंतर टप्प्याटप्प्याने संपूर्ण जलमार्ग जाळे विकसित केले जाणार आहे. या प्रकल्पासाठी एकूण १२ अत्याधुनिक बोटी मागविण्यात आल्या असून त्या पर्यावरणपूरक तंत्रज्ञानावर आधारित आहेत. या बोटींचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा वेग आणि ऊर्जा कार्यक्षमता. ताशी सुमारे ४० किलोमीटर वेगाने धावणाऱ्या या बोटी एका वेळी ३० प्रवाशांना वाहून नेऊ शकतात. हायड्रोफोईल तंत्रज्ञानामुळे बोट पाण्याच्या पृष्ठभागावर कमी प्रतिरोध निर्माण करत पुढे सरकते. त्यामुळे इंधन किंवा ऊर्जा खर्च कमी होतो आणि प्रवास अधिक वेगवान व आरामदायी बनतो. महामुंबईतील वाहतूक कोंडी ही गेल्या काही वर्षांत गंभीर समस्या बनली आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि आसपासच्या शहरांमधून दररोज लाखो नागरिक कामानिमित्त प्रवास करतात. परिणामी रस्त्यांवर वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे. अनेकदा अवघ्या अर्ध्या तासाचा प्रवास पूर्ण करण्यासाठी दीड ते दोन तास खर्च करावे लागतात. ही समस्या केवळ मुंबईपुरती मर्यादित नसून संपूर्ण महानगर प्रदेशात ती प्रकर्षाने जाणवते. मुंबई-अहमदाबाद, मुंबई-नाशिक आणि मुंबई-गोवा या प्रमुख महामार्गांवर सातत्याने वाहतूक कोंडी होत असते. त्याचबरोबर ठाणे, भिवंडी, कल्याण, डोंबिवली, पनवेल आणि नवी मुंबई या भागांमध्येही वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि औद्योगिक विकासामुळे या भागांतील दळणवळण व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. आज महामुंबईची भौगोलिक व्याप्ती रायगड जिल्ह्यातील रोहा, कर्जत आणि खोपोलीपर्यंत तसेच ठाणे जिल्ह्यातील कसारा, मुरबाड आणि भिवंडीपर्यंत विस्तारली आहे. शहराचा विस्तार जसजसा वाढत आहे, तसतशी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची गरजही अधिक तीव्र होत आहे. याच पार्श्वभूमीवर जलमेट्रो हा पर्यायी आणि प्रभावी वाहतूक पर्याय म्हणून पुढे येत आहे. तज्ज्ञांच्या मते, मुंबईसारख्या समुद्रकिनारी वसलेल्या महानगरासाठी जलमार्गांचा वापर हा अत्यंत व्यवहार्य पर्याय ठरू शकतो. शहराभोवती असलेली खाडी, समुद्रकिनारे आणि नैसर्गिक जलमार्ग यांचा वाहतुकीसाठी उपयोग केल्यास रस्ते व रेल्वे यांवरील भार कमी होण्यास मदत होईल. शिवाय, जलमार्गांवरील प्रवास वेळेची बचत करणारा आणि तुलनेने कमी खर्चिक ठरू शकतो. महामुंबईची लोकसंख्या दोन कोटींच्या पुढे गेली असून आगामी काळात ती आणखी वाढण्याचा अंदाज आहे. त्यामुळे वाहतुकीच्या नव्या सुविधा निर्माण करणे ही काळाची गरज बनली आहे. सध्या शहरकेंद्रित विकासामुळे रोजगार, उद्योग आणि सेवा क्षेत्रांचा मोठा भाग मुंबई आणि आसपासच्या परिसरात केंद्रित झाला आहे. परिणामी ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढत असून शहरी भागांवरील ताण वाढत आहे. यावर उपाय म्हणून सरकारकडून मेट्रो मार्गांच्या विस्ताराबरोबरच जलमेट्रो मार्गांनाही प्राधान्य दिले जात आहे. महामुंबईच्या विकास आराखड्यात मेट्रो, रेल्वे, जलवाहतूक आणि रस्ते वाहतूक यांचे एकात्मिक जाळे उभारण्यावर भर दिला जात आहे. यामुळे नागरिकांना अधिक वेगवान, सुरक्षित आणि सुलभ प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. दरम्यान, महानगर प्रदेशाच्या विस्तारासाठी ४८ हजार कोटी रुपयांचा व्यापक विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. नव्याने समाविष्ट झालेल्या ७४ गावांच्या विकासासह तिसरी आणि चौथी मुंबई उभारण्याची संकल्पनाही पुढे येत आहे. पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर आणि रायगड जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय विमानतळ यांसारखे महत्त्वाचे प्रकल्प या विस्ताराला अधिक गती देणार आहेत.

# लैंगिक कामगार : अधिकार आणि सामाजिक न्यायाचा शोध

दरवर्षी २ जून हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन' म्हणून पाळला जातो. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अनेकदा दूर ठेवलेल्या, उपेक्षा, तिरस्कार, गैरसमज आणि भेदभावाचा सामना करणाऱ्या लाखो लैंगिक कामगारांच्या जीवनातील वास्तव, त्यांचे प्रश्न, त्यांच्या मानवी हक्कांची गरज आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा पुनर्विचार करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो. लैंगिक कामगारांविषयी समाजात अनेक प्रकारच्या पूर्वग्रहदूषित कल्पना प्रचलित आहेत. त्यामुळे त्यांच्या अस्तित्वाकडे सहसा केवळ नैतिकता, परंपरा किंवा सामाजिक मूल्यांच्या चष्म्यातून पाहिले जाते. मात्र या दृष्टिकोनापलीकडे जाऊन त्यांच्याकडे एक नागरिक, एक मानव आणि मूलभूत अधिकारांचा हक्कदार म्हणून पाहणे ही काळाची गरज आहे. आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन हा केवळ एका व्यवसायाशी संबंधित व्यक्तींच्या प्रश्नांवर चर्चा करण्याचा दिवस नाही, तर मानवी प्रतिष्ठा, सामाजिक समता, आरोग्य, सुरक्षा, लिंगन्याय आणि मानवाधिकार यांच्याशी निगडित व्यापक प्रश्नांवर चिंतन करण्याची संधी आहे.

या दिवसाचा इतिहास १९७५ सालातील एका महत्त्वपूर्ण घटनेशी जोडलेला आहे. फ्रान्समधील ल्योन शहरात त्या काळात लैंगिक कामगारांवर पोलिसांकडून सातत्याने होणारे छापे, अटकसत्रे आणि अन्यायकारक वागणूक याविरोधात मोठे आंदोलन उभे राहिले. अनेक लैंगिक कामगारांनी सेंट-निझिएर चर्चमध्ये आश्रय घेत आपल्या हक्कांसाठी आवाज उठविला. त्यांनी सुरक्षिततेची हमी, पोलिसी अत्याचारांपासून संरक्षण आणि मानवी सन्मानाची मागणी केली. या आंदोलनाने जगभरातील लैंगिक कामगारांच्या हक्क चळवळीला नवी दिशा दिली. त्यांच्या संघर्षाची आठवण म्हणून २ जून हा दिवस पुढे 'आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन' म्हणून ओळखला जाऊ लागला. आज या दिवसाचे स्वरूप जागतिक झाले असून अनेक देशांमध्ये या निमित्ताने परिसंवाद, जनजागृती कार्यक्रम, मानवी हक्क मोर्चे आणि धोरणात्मक चर्चांचे आयोजन केले जाते.

लैंगिक काम हा विषय सामाजिकदृष्ट्या संवेदनशील आणि अनेक स्तरांवर गुंतागुंतीचा आहे. विविध देश, संस्कृती, धर्म आणि सामाजिक व्यवस्थांमध्ये या विषयाकडे पाहण्याचे दृष्टिकोन वेगवेगळे आहेत. काही समाजांमध्ये लैंगिक कामाला नैतिक अधःपतनाचे प्रतीक मानले जाते, तर काही ठिकाणी ते एक प्रकारचे श्रम किंवा व्यवसाय म्हणून स्वीकारले जाते. या मतभेदांमुळे लैंगिक कामगारांच्या जीवनाविषयी वस्तुनिष्ठ चर्चा अनेकदा मागे पडते. प्रत्यक्षात लैंगिक कामगारांच्या जीवनातील प्रश्न हे त्यांच्या व्यवसायापेक्षा अधिक व्यापक आहेत. त्यामध्ये दारिद्र्य, सामाजिक विषमता, लिंगभेद, शिक्षणाचा अभाव, आरोग्याच्या समस्या, हिंसा, कायदेशीर संरक्षणाचा अभाव आणि सामाजिक बहिष्कार यांसारख्या अनेक मुद्द्यांचा समावेश होतो.

भारतासह जगातील अनेक देशांमध्ये लैंगिक काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या मोठी आहे. या क्षेत्रात केवळ महिलाच नव्हे तर पुरुष, तृतीयपंथीय, ट्रान्सजेंडर आणि इतर लैंगिक अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तीही कार्यरत आहेत. त्यामुळे लैंगिक कामगारांचा प्रश्न हा केवळ महिलांच्या प्रश्नांपुरता मर्यादित राहत नाही. तो लिंगवैविध्य, सामाजिक समावेशकता आणि मानवी हक्कांच्या व्यापक चौकटीत समजून घेणे आवश्यक ठरते. विशेषतः तृतीयपंथीय समुदायाला शिक्षण, रोजगार आणि सामाजिक स्वीकार यांचा अभाव असल्याने अनेकांना लैंगिक काम हेच उपजीविकेचे साधन म्हणून स्वीकारावे लागते. या वास्तवाकडे दुर्लक्ष करून केवळ नैतिकतेच्या आधारावर निर्णय घेणे म्हणजे सामाजिक परिस्थितीचे अपूर्ण आकलन होय.

लैंगिक कामगार या क्षेत्रात कसे येतात याची कारणेही विविध स्वरूपाची असतात. काही व्यक्ती आर्थिक गरजांमुळे हा व्यवसाय स्वीकारतात. काहींना कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी, मुलांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी किंवा कर्ज फेडण्यासाठी हा मार्ग निवडावा लागतो. काही प्रकरणांमध्ये महिलांना फसवणूक, मानवी तस्करी, जबरदस्ती किंवा कौटुंबिक परिस्थितीमुळे या क्षेत्रात ढकलले जाते. काही व्यक्ती मात्र स्वतःच्या निर्णयाने हा व्यवसाय स्वीकारतात. त्यामुळे सर्व लैंगिक कामगारांच्या परिस्थितीला एकाच चौकटीत बसविणे योग्य नाही. त्यांच्या जीवनातील विविधता आणि अनुभवांचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे.

समाजातील सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक म्हणजे लैंगिक कामगारांविषयी असलेला सामाजिक कलंक. अनेकांना वाटते की या व्यक्तींना समाजात सन्मानाचे स्थान मिळण्याचा अधिकार नाही. त्यांच्याशी संवाद साधताना लोक टाळाटाळ करतात. त्यांना भाड्याने घर मिळणे कठीण होते. अनेक वेळा त्यांची मुले शाळांमध्ये भेदभावाला सामोरी जातात. काही कुटुंबे आपल्या मुलांना अशा मुलांशी मैत्री करण्यासही परवानगी देत नाहीत. अशा प्रकारच्या सामाजिक बहिष्कारामुळे लैंगिक कामगार आणि त्यांच्या कुटुंबांचे मानसिक आरोग्य प्रभावित होते. सततच्या अपमानामुळे आत्मविश्वास कमी होतो आणि समाजापासून दुरावण्याची भावना निर्माण होते.

लैंगिक कामगारांच्या जीवनातील आणखी एक गंभीर समस्या म्हणजे हिंसा. ग्राहक, दलाल, गुन्हेगारी टोळ्या, स्थानिक गुंड, काही वेळा पोलिस यांच्याकडूनही त्यांना हिंसाचाराचा सामना करावा लागू शकतो. शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि लैंगिक स्वरूपाच्या हिंसेच्या घटना अनेकदा घडत असतात. परंतु सामाजिक कलंक आणि न्याय मिळण्याबाबतची अनिश्चितता यांमुळे अनेक पीडित व्यक्ती तक्रार करण्यास धजावत नाहीत. परिणामी, हिंसाचाराचे चक्र सुरूच राहते. कोणत्याही नागरिकाप्रमाणे लैंगिक कामगारांनाही सुरक्षिततेचा आणि न्याय मिळविण्याचा अधिकार आहे, ही बाब समाजाने मान्य करणे आवश्यक आहे.

आरोग्य हा लैंगिक कामगारांच्या जीवनाशी थेट संबंधित असलेला महत्त्वाचा मुद्दा आहे. लैंगिक संसर्गजन्य रोग,



**डॉ. राजेंद्र बगाटे**

एचआयव्ही/एड्स, प्रजनन आरोग्याच्या समस्या, मानसिक ताण, नैराश्य आणि व्यसनाधीनता यांसारख्या अनेक आव्हानांना त्यांना सामोरे जावे लागते. विशेषतः एचआयव्ही प्रतिबंधाच्या क्षेत्रात गेल्या काही दशकांत अनेक स्वयंसेवी संस्था आणि आरोग्य विभागांनी महत्त्वाचे कार्य केले आहे. कंडोम वापराबाबत जनजागृती, मोफत आरोग्य तपासणी, समुपदेशन आणि उपचार सुविधा यांमुळे परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाली आहे. तथापि, अजूनही अनेक ठिकाणी आरोग्यसेवा मिळविताना लैंगिक कामगारांना भेदभावाचा सामना करावा लागतो. डॉक्टर किंवा आरोग्य कर्मचारी त्यांच्याशी पूर्वग्रहदूषित वागणूक करतात. त्यामुळे आरोग्य सेवा सर्वांसाठी समान आणि सन्मानपूर्वक उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे.

लैंगिक कामगारांच्या मानसिक आरोग्याचा प्रश्नदेखील दुर्लक्षित राहतो. सततचा सामाजिक तिरस्कार, असुरक्षितता, हिंसा, आर्थिक ताण आणि भविष्याबद्दलची अनिश्चितता यांमुळे अनेक व्यक्तींना नैराश्य, चिंता आणि भावनिक तणावाचा सामना करावा लागतो. मानसिक आरोग्याच्या सेवा या समुदायापर्यंत प्रभावीपणे पोहोचत नाहीत. त्यामुळे समुपदेशन, मानसोपचार आणि मानसिक आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रमांची आवश्यकता आहे. मानसिक आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे आणि तो लैंगिक कामगारांनाही तितकाच लागू होतो.

लैंगिक कामगारांच्या मुलांचे जीवन अनेकदा संघर्षमय असते. समाजातील पूर्वग्रहांमुळे त्यांना शिक्षणाच्या क्षेत्रात अडथळे निर्माण होतात. काही मुलांना त्यांच्या पालकांच्या व्यवसायामुळे चिडवले जाते किंवा अपमानित केले जाते. परिणामी, अनेक मुले शिक्षण अर्धवट सोडतात. शिक्षणाचा अभाव म्हणजे पुढील आयुष्यातील संधींची कमतरता. त्यामुळे गरिबी आणि सामाजिक वंचिततेचे चक्र कायम राहते. या परिस्थितीत शासन, स्वयंसेवी संस्था आणि शैक्षणिक संस्था यांनी एकत्रितपणे काम करून अशा मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिष्यवृत्ती, निवास सुविधा आणि भावनिक आधार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

मानवी तस्करी आणि लैंगिक काम या दोन भिन्न बाबी आहेत, हे स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे. अनेकदा या दोन्ही गोष्टींची गल्लत केली जाते. मानवी तस्करी म्हणजे व्यक्तींना फसवून, धमकावून किंवा जबरदस्तीने शोषणासाठी वापरण्याची गुन्हेगारी प्रक्रिया होय. दुसरीकडे, काही व्यक्ती स्वतःच्या इच्छेने लैंगिक काम करतात. त्यामुळे मानवी तस्करीविरोधी उपाययोजना करताना स्वेच्छेने काम करणाऱ्या व्यक्तींच्या हक्कांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. तस्करीविरोधी लढा आणि लैंगिक कामगारांच्या मानवी हक्कांचे संरक्षण या दोन्ही गोष्टी एकाच वेळी शक्य आहेत.

जगभरातील विविध देशांमध्ये लैंगिक कामाबाबत वेगवेगळे कायदे आहेत. काही देशांमध्ये हा व्यवसाय पूर्णपणे कायदेशीर आहे आणि त्यावर विशिष्ट नियम लागू आहेत. काही देशांमध्ये अंशतः मान्यता आहे, तर काही ठिकाणी तो पूर्णपणे बेकायदेशीर आहे. प्रत्येक व्यवस्थेचे फायदे आणि मर्यादा आहेत. कायदेशीर मान्यता असलेल्या देशांमध्ये आरोग्य, सुरक्षा आणि कामगार हक्कांच्या दृष्टीने काही संरक्षण उपलब्ध असते. तथापि, केवळ कायदेशीर मान्यता दिल्याने सर्व समस्या सुटतात असे नाही. सामाजिक कलंक आणि भेदभाव यांवरही तितक्याच गांभीर्याने काम करणे आवश्यक असते.

भारतातील परिस्थिती तुलनेने गुंतागुंतीची आहे. येथे लैंगिक काम स्वतःमध्ये थेट गुन्हा नाही, परंतु त्याच्याशी संबंधित अनेक कृतींवर कायदेशीर निर्बंध आहेत. त्यामुळे लैंगिक कामगार अनेकदा कायदेशीर अनिश्चिततेत जगतात. अलीकडच्या वर्षांत न्यायालयांनी लैंगिक कामगारांच्या मानवी प्रतिष्ठेचा आणि घटनात्मक अधिकारांचा पुनरुच्चार केला आहे. न्यायव्यवस्थेने स्पष्ट केले आहे की प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. हा दृष्टिकोन मानवाधिकारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

लैंगिक कामगारांच्या सक्षमीकरणासाठी विविध स्वयंसेवी संस्था आणि समुदाय आधारित संघटना कार्यरत आहेत. या संस्था आरोग्य सेवा, कायदेशीर मदत, शिक्षण, आर्थिक सक्षमीकरण, समुपदेशन आणि जनजागृती यांसारख्या क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान देतात. अनेक ठिकाणी लैंगिक कामगारांनी स्वतःच्या संघटना स्थापन करून आपले प्रश्न मांडण्यास सुरुवात केली आहे. ही बाब त्यांच्या आत्मसन्मानासाठी आणि नेतृत्व विकासासाठी महत्त्वाची आहे. जेव्हा एखादा समुदाय स्वतःच्या प्रश्नांसाठी संघटित होतो, तेव्हा सामाजिक बदलाची प्रक्रिया अधिक प्रभावी ठरते.

स्त्रीवादी चळवळींमध्येही लैंगिक कामाविषयी भिन्न मतप्रवाह दिसून येतात. काही विचारवंतांच्या मते हा व्यवसाय स्त्रियांच्या शोषणाशी संबंधित आहे, तर काहींच्या मते तो महिलांच्या स्वायत्ततेचा आणि निवडीच्या अधिकाराचा भाग आहे. या वादांमध्ये विविध मतभेद असले तरी लैंगिक कामगारांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि मानवी हक्कांचे संरक्षण हा समान धागा दिसून येतो. त्यामुळे मतभेदांपलीकडे जाऊन त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी व्यावहारिक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

कोविड-१९ महामारीच्या काळात लैंगिक कामगारांच्या असुरक्षिततेचे वास्तव अधिक ठळकपणे समोर आले. लॉकडाऊनमुळे त्यांचे उत्पन्न अचानक बंद झाले. अनेकांकडे बचत नव्हती, सामाजिक सुरक्षा नव्हती आणि पर्यायी रोजगाराच्या संधीही नव्हत्या. परिणामी, हजारो कुटुंबांना अन्न, औषधे आणि निवाऱ्याच्या समस्या निर्माण झाल्या. या काळात अनेक स्वयंसेवी संस्थांनी मदतीचा हात पुढे केला. या अनुभवाने असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा यंत्रणा किती महत्त्वाची आहे हे अधोरेखित केले.

आर्थिक सक्षमीकरण हा लैंगिक कामगारांच्या जीवनातील बदलाचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. अनेक व्यक्तींना पर्यायी रोजगाराच्या संधी, कौशल्य प्रशिक्षण, लघुउद्योग, स्वयंरोजगार आणि आर्थिक साक्षरता कार्यक्रमांचा लाभ मिळाल्यास त्यांचे जीवन अधिक स्थिर होऊ शकते. काही व्यक्तींना हा व्यवसाय सोडून इतर क्षेत्रांत काम करायचे असते, परंतु शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक भेदभाव यांमुळे त्यांना संधी मिळत नाही. त्यामुळे शासनाने आणि सामाजिक संस्थांनी पुनर्वसन व कौशल्य विकासाच्या योजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

माध्यमांची भूमिका या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. चित्रपट, दूरदर्शन मालिका, वेब मालिका आणि वृत्तांकनामध्ये लैंगिक कामगारांचे चित्रण अनेकदा रूढ कल्पनांवर आधारित असते. काही वेळा त्यांना गुन्हेगारी, नैतिक अधःपतन किंवा सनसनाटीपणाशी जोडले जाते. अशा चित्रणामुळे समाजातील पूर्वग्रह अधिक बळकट होतात. माध्यमांनी त्यांच्या जीवनातील वास्तव, संघर्ष, मानवी भावना आणि सामाजिक प्रश्न यांचे संतुलित व संवेदनशील चित्रण करणे आवश्यक आहे.

पान १ वरून...

## 'डाक सेवा गिफ्ट्स'चे मेसेज ठरले खोटे!

पीआयबीने स्पष्ट केले आहे की, इंडिया पोस्ट अशी कोणतीही योजना, लकी ड्रॉ किंवा बक्षीस वाटप करत नाही. या मेसेजशी डाक विभागाचा कोणताही संबंध नाही. हा केवळ नागरिकांची फसवणूक करण्याचा एक डाव आहे. अशा बनावट लिंक्सवर क्लिक केल्यास मोबाईल किंवा कॉम्प्युटरमध्ये मालवेअर (व्हायरस) शिरू शकतो किंवा युजर्सची 'फिशिंग' वेबसाईटवर दिशाभूल केली जाऊ शकते. त्यामुळे कोणत्याही संशयास्पद किंवा अनोळखी लिंकवर क्लिक करू नका. बँक खात्याची माहिती, एटीएम पिन, ओटीपी किंवा आधार-पॅन सारखी सरकारी ओळखपत्रे कोणाशीही शेअर करू नका. केंद्र सरकारशी संबंधित असा कोणताही संशयास्पद मेसेज, फोटो किंवा व्हिडिओ आढळल्यास त्याची थेट 'पीआयबी फॅक्ट चेक' टीमकडे तक्रार करा. असे अधिकाऱ्यांनी नागरिकांना या गोष्टींची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. इंडिया पोस्ट कधीही मेसेज किंवा लिंक्स पाठवून नागरिकांकडून त्यांची वैयक्तिक किंवा आर्थिक माहिती मागत नाही. डाक विभागाच्या सर्व अधिकृत घोषणा आणि योजना केवळ त्यांच्या अधिकृत वेबसाईटवरच प्रसिद्ध केल्या जातात. त्यामुळे हा मेसेज पुढे फॉरवर्ड न करता, कोणतीही माहिती नेहमी अधिकृत स्रोतांकडूनच पडताळून पहा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ई-बसेससाठी चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

बैठकीत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पर्यावरणपूरक ई-बसेस ज्या मार्गावर चालवायच्या आहेत, त्या मार्गाचा कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाने सखोल अभ्यास करावा. पुरवठादाराकडून बस प्राप्त होताच पुढील ७ दिवसांत तिचे निरीक्षण करून या बसेसकरिता एक भक्कम इकोसिस्टिम तयार करावी. तसेच, ज्या मार्गांवर सध्या खाजगी बसेस धावतात, त्या मार्गांचाही अभ्यास करून तिथे ई-बसेसचा सक्षम पर्याय तयार ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. राज्य शासनाच्या विद्यमान ई-वाहन धोरणानुसार सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत ई-बसेसचा वापर वाढविण्यासाठी विशेष प्रोत्साहन दिले जात आहे. या धोरणांतर्गत १,५०० ई-बसेसना बसच्या किमतीच्या १० टक्के किंवा कमाल २० लाख रुपये इतके अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील पर्यावरणपूरक आणि शाश्वत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था विकसित करण्यासाठी हे धोरण अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. सध्या एसटी महामंडळ जीसीसी (GCC) मॉडेलवर ५,१५० ई-बसचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवत असून, या प्रकल्पामुळे राज्यातील प्रवाशांना आधुनिक, आरामदायी आणि प्रदूषणमुक्त प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## मुंबई जल मेट्रोला गती

प्रारंभी या फेऱ्या गेटवे ऑफ इंडिया ते अलिबाग आणि मांडवा ते वर्सोवा-मढ या दोन प्रमुख मार्गांवर धावण्याची शक्यता आहे. मुंबई महानगर प्रदेशात जलवाहतुकीचे व्यापक जाळे उभारण्याच्या राज्य सरकारच्या योजनेचा हा महत्त्वाचा भाग आहे. या प्रकल्पाअंतर्गत मुंबई आणि आसपासच्या परिसरात सुमारे ३४० किलोमीटर लांबीचे जल मेट्रो नेटवर्क विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यासाठी सुमारे ६,५०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात १२५ किलोमीटर लांबीचे २१ जलमार्ग आणि २० स्थानकांचा विकास केला जाणार आहे, तर दुसऱ्या टप्प्यात २१५ किलोमीटर लांबीचे १६ नवीन जलमार्ग आणि २४ स्थानके उभारली जाणार आहेत. यासाठी ३,४३६ कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून त्यातील मोठा हिस्सा २०१ इलेक्ट्रिक आणि हायब्रिड फेऱ्यांच्या खरेदीसाठी खर्च केला जाणार आहे. या प्रकल्पामुळे मुंबईतील वाहतूक कोंडी आणि लोकल रेल्वेवरील ताण कमी होण्यास मदत होणार असून भविष्यात देशातील अनेक शहरांमध्येही जल मेट्रो सेवा विस्तारली जाणार आहे.

## वसई-विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)**
**मुख्य कार्यालय विरार**
**दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३**

जावक क्र.:-व.वि.श.म./क.वि./४९४/२६-२७
दिनांक :- २०/५/२६

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | आचोळे-१२ | NL२१/३६३/२ | २३९४१ | अल्बर्ट ए. रॉड्रीक्स | श्यामजीत गुरह गुप्ता |
| २. | आचोळे-१२ | NL२१/३६३/३८ | २३९९९ | अल्बर्ट ए. रॉड्रीक्स | अब्दुल रजाक नुरमोहम्मद खान |
| ३. | आचोळे-१२ | NL२१/४०५/७ | २४२६५ | वालचन्द्रा रामवचन मिस्त्री | अशफाक अहमद |
| ४. | आचोळे-१२ | NL२१/९/३३ | २४२६९ | अनिल कुमार शुक्ला | विकास सिंह व रेनू सिंह |
| ५. | आचोळे-१२ | NL२१/२९८/१६१ | २४२७१ | अल्बर्ट ए. रॉड्रीग्स | अशोक मनसुख तवडीया |
| ६. | आचोळे-१२ | NL२१/२६२/२७ | २४०१० | अन्सारी अबीदा बेगम | सुबीना अलीजन शेख |
| ७. | आचोळे-१२ | NL२१/३२६/१२ | २४०११ | जमुना बाबु भुतोडिया | जया रमेश भुतोडिया |
| ८. | आचोळे-१२ | NL२१/२९८/१७८ | २४६०१ | रामलखन रामखेलावन पांण्डये | पुजा ललित पाण्डेय |
| ९. | आचोळे-१२ | NL२१/१०८/२१ | २४२१९ | काजल राजेश मेहता | रुतिका राहुलकुमार भयानी व भयानी राहुल जितेंद्रभाई |
| १०. | आचोळे-१२ | NL२१/३८२/२६ | २४२१८ | दिनेश शर्मा | शनि विपत शर्मा |
| ११. | आचोळे-१२ | NL२१/१३८/१७ | २४२११ | मुकेश रमेश चव्हाण | हमिदा बानो वसीउल्ला खान |
| १२. | आचोळे-१२ | NL२१/१११/२७ | २४२१३ | सुनिल जयसिंग सावंत | प्राची प्रताप गावडे |
| १३. | आचोळे-१२ | NL२१/१५२/२१ | २४६३६ | तीरथ दुधनाथ यादव | सिताराम रामदास सोनी |
| १४. | आचोळे-१२ | NL२१/२४९/१०३ | २५८१२ | हरिकेश मिना | दिपक शंकरलाल दिदवानियॉ व जयकिशर शंकरलाल दिदवानियॉ |
| १५. | आचोळे-१२ | NL२१/३६८/२३ | २५६८१ | सुजित ब्रम्हदेव मिश्रा | शाईस्ता बानो आजाद शेख |
| १६. | आचोळे-१२ | NL२१/३०५/७ | २५७८८ | धनंजय राजकिशोर तिवारी | मित्तल ब्रजलाल विसावडीया |
| १७. | आचोळे-१२ | NL२१/२५७/६६ | २४६४२ | विजय बहादुर शर्मा | नीरु भरत वाघरी/किरण भरत वाघरी |
| १८. | आचोळे-१२ | NL२१/२१७/२८ | २४६४३ | हेमंतकुमार उपाध्याय/वंदना हेमंत उपाध्याय | संकेत सुभाष खापरे व सुप्रीया संकेत खापरे |
| १९. | आचोळे-१२ | NL२१/२८१/२ | २४६४१ | कृष्णकांत मिश्रा | आरती सुनिल सोनी |
| २०. | आचोळे-१२ | NL२१/२७६/४३ | २४६५० | निलोफर रफिक वालखेंडी | अमोल बाबुराव खरात |

XXX
(मेधा वर्तक)
सहायक आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा

जा.क्र.वविशम/क.वि/४९४/२०२६-२०२७

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.** • Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# मृणालताई गोरे उड्डाणपूल, ओशिवरा प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश

**मुंबई (राकेश गायकवाड) :** गोरेगाव ते राम मंदिर मार्गावरील मृणालताई गोरे उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात असून तब्बल ९० ते ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. हा महत्त्वाचा उड्डाणपूल लवकरात लवकर वाहतुकीसाठी खुला करावा. सुमारे १५२ रुग्णशय्या क्षमतेच्या ओशिवरा प्रसूतिगृह इमारतीचे बांधकाम गुणवत्तापूर्ण पद्धतीने आणि निर्धारित मुदतीत पूर्ण करावे. ओशिवरा स्मशानभूमीच्या प्रलंबित कामांना गती देऊन ती तातडीने मार्गी लावावीत, अशा सूचना उपमहापौर श्री. संजय घाडी यांनी केल्या. मुंबईचे उपमहापौर श्री. संजय घाडी यांनी दिनांक २९ मे २०२६ मृणालताई गोरे उड्डाणपूल, ओशिवरा प्रसुतिगृह व ओशिवरा स्मशानभूमीच्या कामांची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली व आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी विविध सूचना केल्या. सहायक आयुक्त (पी उत्तर विभाग) श्री. कुंदन वळवी, सहायक आयुक्त



(पी दक्षिण विभाग) श्री. अनिरुद्ध कुलकर्णी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल पांपटवार यांच्यासह संबंधित महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. प्रसारमाध्यम प्रतिनिधींसमवेत संवाद साधताना श्री. घाडी म्हणाले की, मृणालताई गोरे रेल्वे उड्डाणपूल (मुख्य पूल) सन २०१६ मध्ये वाहतुकीसाठी खुला करण्यात आला होता. सध्या पुलाच्या विस्ताराचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले असून विविध पूरक कामांना वेग देण्यात आला आहे. रस्त्याचे पुनर्पृष्ठीकरण (रिसरफेसिंग), दिशादर्शक फलक उभारणे, दिवाबत्ती व्यवस्था, गतिरोधक बसविणे, तसेच रस्त्यावर पांढरे व पिवळे पट्टे आखणे आणि पुलाच्या कठड्यांचे रंगकाम आदी कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. पुलाच्या दोन्ही बाजूंना निवासी इमारती व वसाहती असल्यामुळे नागरिकांना ध्वनीप्रदूषणाचा त्रास होऊ नये, यासाठी दोन्ही बाजूंना ध्वनीरोधक (Noise Barrier) उभारण्यात आले आहेत. तसेच, पुलाची लोड टेस्ट पूर्ण करून पावसाळ्यापूर्वी उर्वरित सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत आणि उड्डाणपूल तातडीने वाहतुकीसाठी खुला करावा, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. यासोबतच, रहदारीचे प्रभावी व्यवस्थापन करून परिसरातील नागरिकांना वाहतूक कोंडीतून दिलासा मिळावा, यासाठी प्रशासनाने आवश्यक ती तत्पर कार्यवाही करावी, असेही निर्देश देण्यात आले आहेत. १५२ रुग्णशय्या क्षमतेच्या ओशिवरा प्रसूतिगृह (मॅटर्निटी होम) इमारतीचा विकास प्रकल्प वेगाने सुरू असून अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांनी सज्ज आरोग्यसेवा केंद्र उभारण्यात येत आहे. या प्रकल्पामध्ये शस्त्रक्रिया विभाग, नवजात बालक अतिदक्षता विभाग (एनआयसीयू), लहान मुलांसाठी एमआयसीयू, डायलिसिस विभाग, सिटी स्कॅन सुविधा, तसेच डॉक्टर व परिचारिकांसाठी निवासी व्यवस्था आदी महत्त्वपूर्ण कामांचा समावेश आहे. या प्रकल्पाच्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. इमारतीचे बांधकाम उच्च गुणवत्तेचे व निर्धारित मुदतीत पूर्ण करण्यात यावे, तसेच नागरिकांना आधुनिक व दर्जेदार वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा स्पष्ट सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. ओशिवरा स्मशानभूमीतील काही कामे अद्याप अपूर्ण अवस्थेत आहेत. ही सर्व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून परिसरातील नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा स्पष्ट सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. पुढील पंधरा दिवसांच्या आत स्मशानभूमीतील छोटी-मोठी सर्व कामे पूर्ण करण्यासाठी युद्धपातळीवर कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले असल्याची माहिती उपमहापौर श्री. संजय घाडी यांनी दिली.

# स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीचे निर्देश

**मुंबई (नितीन देवळेकर) :** स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी शासनाकडून विविध योजना राबविण्यात येत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेत या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन स्वच्छता कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ द्यावा, असे निर्देश महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग (मुंबई) चे माननीय उपाध्यक्ष श्री. मुकेश सोनू सरवान यांनी दिले आहेत. स्वच्छता कर्मचाऱ्यांशी संबंधित विविध बाबींचा श्री. सरवान यांनी दिनांक २९ मे २०२६ बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. दरम्यान, श्री. सरवान यांनी महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांची भेट घेतली. कुलाबा परिसरातील राजवाडकर मार्ग, पंचशील नगर येथे आश्रय योजना अंतर्गत स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात आलेल्या वसाहतीची प्रत्यक्ष पाहणी देखील श्री. सरवान यांनी केली. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी, उपायुक्त (सामान्य प्रशासन) श्री. किशोर गांधी, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) श्री. किरण दिघावकर, उपायुक्त (अभियांत्रिकी) श्री. शशांक भोरे यांच्यासह संबंधित अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते. बृहन्मुंबई महानगरपालिकेतील स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी तसेच सामाजिक न्याय विभाग व नगरविकास विभाग यांच्याकडील शासन निर्णयांनुसार, स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेबाबत



२५ वर्षांपेक्षा अधिक सेवा झालेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना पात्रतेच्या निकषांनुसार मालकी तत्त्वावर मोफत सदनिका उपलब्ध करुन देण्याबाबत सद्यस्थितीचा श्री. सरवान यांनी आढावा घेतला. तसेच, दूषित गटारांमध्ये काम करताना मृत्यू पावलेल्या किंवा कायम अपंगत्व अथवा अपंगत्व आलेल्या हाताने मैला वाहून नेणाऱ्या (मॅन्युअल स्कॅव्हेंजर) किंवा स्वच्छता कर्मचाऱ्यांना नुकसान भरपाई करण्यासंदर्भातील सद्यस्थितीची माहिती देखील त्यांनी जाणून घेतली. दरम्यान, शासनाच्या तरतुदींनुसार, वारसा हक्काच्या प्रलंबित प्रकरणांची माहिती व स्वच्छता कर्मचाऱ्यांची मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदांची माहिती तसेच महानगरपालिकेत कार्यरत स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा अहवाल सादर करावा. तसेच, त्यावर योग्य ती कारवाई करावी, असे निर्देश महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे माननीय उपाध्यक्ष श्री. मुकेश सोनू सरवान यांनी यावेळी दिले.

# गणवेशावर 'समग्र शिक्षा' लोगोची सक्ती

**मुंबई (गणेश बागडे) :** शालेय शिक्षण विभागाने मोफत गणवेश योजनेत महत्त्वाचे बदल करत विद्यार्थ्यांच्या गणवेशावर समग्र शिक्षा अभियान (एसएसए) लोगो लावणे बंधनकारक केले आहे. या निर्णयामुळे राज्यातील शाळा व्यवस्थापन समित्या, शिक्षक आणि गणवेश पुरवठादारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. नवीन शैक्षणिक वर्षाच्या तोंडावर शालेय शिक्षण विभागाने मोफत गणवेशावर (एसएसए) लोगो लावणे बंधनकारक करत नवा शासन निर्णय जारी केला आहे, तर दुसऱ्या बाजूला मतदार यादी विशेष पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेतील कामकाजासाठी शिक्षकांवर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समित्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. राज्य शासनाने २९ मे रोजी मोफत गणवेश योजनेत सुधारणा करणारा शासन निर्णय प्रसिद्ध केला. या निर्णयानुसार यंदापासून पात्र विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या गणवेशाच्या दर्शनी भागावर एसएसएचा लोगो असणे अनिवार्य राहणार आहे. तसेच गणवेशासाठी वापरल्या जाणाऱ्या कापडाच्या दर्जाबाबतही कठोर अटी घालण्यात आल्या आहेत. शंभर टक्के पॉलिस्टर कापड टाळण्याच्या सूचना देत विद्यार्थ्यांच्या आरोग्यास पोषक आणि दर्जेदार कापड वापरण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र अनेक शाळांनी ऑक्टोबरपासूनच



गणवेश खरेदी आणि शिवणकामाची प्रक्रिया सुरू केली होती. काही ठिकाणी गणवेश तयार होऊन वितरणासाठी सज्ज आहेत. अशा वेळी शाळा सुरू होण्यास अवघे दोन आठवडे आधी लोगो सक्तीचा निर्णय आल्याने आधीच तयार असलेल्या गणवेशांचे काय करायचे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाचा उद्देश योग्य असला तरी निर्णयाची वेळ चुकीची आहे. गणवेशावर लोगो लावण्यास कोणाचाही विरोध नाही; मात्र नियोजनबद्ध पद्धतीने निर्णय घेतला असता तर अडचणी टाळता आल्या असत्या. आता अनेक शाळांना अतिरिक्त खर्च आणि वेळेचा प्रश्न भेडसावणार आहे, असे शिक्षक संघटनांचे म्हणणे आहे. गेल्या तीन वर्षांत गणवेश योजना तिसऱ्यांदा वादाच्या केंद्रस्थानी आली आहे. २०२४ मध्ये 'एक राज्य, एक गणवेश' धोरणामुळे गणवेश वितरणात विलंब झाला होता. त्यानंतर २०२५ मध्ये महिला बचत गटांकडूनच गणवेश शिवून घेण्याच्या निर्णयामुळे गोंधळ निर्माण झाला.

# विमान कपातीचा मुंबई विमानतळाला फटका; मुंबई ते जयपूर, गोवा, बंगळुरु व हैदराबाद मार्गावर परिणाम

**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** वाढत्या विमान इंधन दरांमुळे इंडिगो,एअर इंडियासह एअर इंडिया एक्सप्रेसने देशांतर्गत विमान वाहतूकीत कपात केली आहे. १ जूनपासून दररोज देशांतर्गत २५० हून अधिक उड्डाणे रद्द होणार असल्याने याचा सर्वाधिक फटका मुंबई विमानतळाला बसला आहे. विमान कपातीचा परिणाम मुंबई ते जयपूर, गोवा, बंगळूरु व हैदराबाद या प्रमुख मार्गांवर होणार आहे. वाढत्या इंधन दरवाढीमुळे आणि प्रवासी मागणीतील घटीमुळे विमान कंपन्यांना मोठा फटका बसत आहे. वाढता तोटा कमी करण्यासाठी देशातील तीन प्रमुख विमान कंपन्या इंडिगो,एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेसने देशांतर्गत विमान संख्येत कपात केली आहे, जून ते ऑगस्ट दरम्यान



देशांतर्गत विमान संख्या कमी असणार आहे. या तीन महिन्यात इंडिगो ११०, एअर इंडिया ११० आणि एअर इंडिया एक्स्प्रेस ३०-३५ उड्डाणे कमी करणार आहे. देशातील सर्वात व्यस्त विमान वाहतूक केंद्रांपैकी मुंबई विमानतळ एक आहे.मुंबई विमानतळावरुन दररोज १ हजार विमानांची ये-जा होते.त्यापैकी सुमारे ४५० ते ५०० विमाने देशांतर्गत वाहतूक करतात. विमान कपातीमुळे मुंबईतून जयपूर, गोवा, बंगळूर, हैदराबाद, चेन्नई, अहमदाबाद, नागपूर, पाटणा आणि भोपाळ यांसारख्या अनेक प्रमुख देशांतर्गत मार्गांवरील विमान फेऱ्या कमी होणार आहेत. या निर्णयामुळे विमानांमध्ये गर्दी, जागांची मर्यादित उपलब्धता आणि विमान तिकिट दरात पुन्हा वाढ होण्याची शक्यता आहे. सध्या दररोज सुमारे २,२०० उड्डाणे चालवणारी इंडिगो, आपली देशांतर्गत क्षमता जवळपास ५-७ टक्क्यांनी कमी करत आहे, ज्यामुळे दररोज अंदाजे ११० उड्डाणे कमी होतील. एअर इंडिया जून आणि जुलै महिन्यात आपल्या देशांतर्गत सेवांमध्ये जवळपास २२ टक्के कपात करणार आहे. ज्यामुळे दररोजच्या सुमारे ५०० उड्डाणांच्या वेळापत्रकातून अंदाजे ११० उड्डाणे कमी होतील. दरम्यान, एअर इंडिया एक्सप्रेस आपल्या देशांतर्गत सेवांमध्ये जवळपास १० टक्के कपात करत आहे, ज्यामुळे दररोज सुमारे ३०-३५ उड्डाणे कमी होतील. एप्रिल महिन्यात देशांतर्गत विमानसेवांसाठी लागणाऱ्या इंधनाच्या दरात जवळपास २५ टक्क्यांनी वाढ झाल्याने विमान कंपन्यांचा परिचालन खर्च लक्षणीयरीत्या वाढला आहे.विमान कंपन्यांनी उन्हाळ्याच्या ऐन गर्दीनंतर प्रवासाची मागणी कमी झाल्याचेही निदर्शनास आणले आहे. अनेक मार्गांवरील विमान तिकिटात आधीच जवळपास ३० टक्क्यांनी वाढ झाली असून, विमान कंपन्यांनी प्रति प्रवासी ४०० ते ४५० रुपयांपर्यंत इंधन अधिभारही आकारला आहे. त्यातच आता विमानांची संख्या आणखी कमी झाल्याने तिकिट दरात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. आसन क्षमता कमी झाल्याने आणि कॉर्पोरेट व पर्यटकांकडून असलेल्या सततच्या मागणीमुळे, मुंबई, दिल्ली आणि बंगळूरुला जोडणाऱ्या मार्गांवर मोठ्या प्रमाणात भाडेवाढ होईल.

# एआयच्या मदतीने इमारत परवानग्या; BMCची 'CivitTwin' प्रणाली सुरु



**मुंबई (विशाल कारंडे) :** मुंबईतील नागरी प्रशासन अधिक पारदर्शक, वेगवान आणि तंत्रज्ञान आधारित करण्याच्या दिशेने बृहन्मुंबई महानगरपालिकेने आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) व्यवहारांसाठी भारतातील पहिली ई-टीडीआर (E-TDR) प्रणाली कार्यान्वित केल्यानंतर आता महानगरपालिकेकडून 'CivitTwin' ही भारतातील पहिली कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence-AI) आधारित बांधकाम / इमारत परवानगी प्रणाली सुरू करण्यात आली आहे. वांद्रे कुर्ला संकुलातील जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटर येथे आयोजित 'मुंबई टेक् वीक २०२६' मध्ये मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते दिनांक २९ मे २०२६ या प्रणालीचे लोकार्पण करण्यात आले. 'मुंबई टेक् वीक २०२६' मध्ये ग्रामीण भागासाठी 'महा-विस्तार' या शेतकऱ्यांसाठी समर्पित आणि मुंबईसाठी 'CivitTwin' ही भारतातील पहिली कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence-AI) आधारित बांधकाम / इमारत परवानगी प्रणालीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी मुंबईच्या महापौर श्रीमती रितू तावडे, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे आदी उपस्थित होते. "डिजिटल अप्रूव्हल ट्विन" (Digital Approval Twin) या संकल्पनेवर आधारित असलेली ही प्रणाली मुंबईतील इमारत परवानगी प्रक्रिया जलद, अचूक, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्यासाठी विकसित करण्यात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे 'CivitTwin' प्रणालीबाबत माहिती दिली. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांच्या निर्देशानुसार ई-टीडीआर (E-TDR) प्रणालीनंतर आता 'CivitTwin' ही भारतातील पहिली कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence-AI) आधारित बांधकाम / इमारत परवानगी प्रणाली सुरू करण्यात आली आहे. महानगरपालिकेने 'CivitTwin' ही अभिनव प्रणाली कार्यान्वित करून नागरी प्रशासनातील डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने मोठे पाऊल उचलले आहे. ही प्रणाली इमारत / बांधकाम प्रस्तावांची प्रत्यक्ष सादरीकरणापूर्वीच 'आभासी पूर्व-तपासणी' (Virtual Pre-Scrutiny) करणार आहे. त्यामुळे वास्तुविशारद, विकासक आणि संबंधित व्यावसायिकांना प्रस्तावातील त्रुटी, अपूर्ण कागदपत्रे, नियमभंग किंवा आवश्यक ना हरकत प्रमाणपत्रे (NOC) यांची माहिती सुरुवातीलाच मिळणार आहे. परिणामी मंजुरी प्रक्रियेत होणारा विलंब मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. सध्या बांधकाम / इमारत प्रस्ताव सादर केल्यानंतर अनेकदा ते आक्षेपांसह परत पाठवले जातात. अपूर्ण अर्ज, गहाळ कागदपत्रे, विकास नियंत्रण नियमांचे (Development Control Regulations-DCR) उल्लंघन किंवा आवश्यक परवानग्यांचा अभाव यामुळे प्रस्तावांमध्ये वारंवार दुरुस्त्या कराव्या लागतात. या प्रक्रियेमध्ये अनेक आठवडे, तर काही वेळा महिन्यांचाही विलंब होत असतो. 'CivitTwin' ही प्रणाली या समस्यांवर प्रभावी तोडगा म्हणून विकसित करण्यात आली आहे. महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांनी सादरीकरणाद्वारे या प्रणालीबाबत सविस्तर माहिती दिली. या प्रणालीमध्ये वास्तुविशारद किंवा विकासक बांधकाम आराखडे आणि संबंधित कागदपत्रे अपलोड करताच कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणाली त्यांची 'आभासी पूर्व-तपासणी' (Virtual Pre-Scrutiny) करेल. प्रणालीकडून विकास नियंत्रण नियमांनुसार अनुपालन तपासले जाणार आहे. आवश्यक कागदपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. प्रकल्पास लागणारी ना हरकत प्रमाणपत्रे (NOC) ओळखून अनेक अर्ज, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम व प्रस्तावातील विविध चेक लिस्ट ही विकासकांना, वास्तुविशारदांना आणि परवानाधारक सर्वेक्षकांना स्वत: भरावी लागत होती. सर्व कागदपत्र पडताळणी करून त्यातील विसंगती, चुका, उणीवा शोधणे हे खूप जिकिरीचे काम होते. ही कामे आता कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'एआय' मार्फत केली जाणार असल्याने सर्व माहिती थेट आराखड्यांमधून स्वयंचलितपणे भरली जाणार आहे.

# मुंबईत ३००ठिकाणी भूस्खलनाचा धोका!

**मुंबई (सम्यक कासारे) :** मान्सूनच्या आगमनापूर्वी शहरातील भूस्खलनास संवेदनशील असलेल्या डोंगर उतारांवरील ३०० हून अधिक ठिकाणी भूस्खलन प्रतिबंधक कामे अपूर्ण राहिली आहेत, ज्यामुळे उच्च जोखमीच्या भागात राहणाऱ्या सुमारे १ लाख लोकांच्या सुरक्षेबाबत चिंता वाढली आहे. महानगरपालिकेच्या आकडेवारीनुसार, २०२३ पासून सुरू करण्यात आलेल्या ७४९ भूस्खलन प्रतिबंधक कामांपैकी केवळ ४४० कामे पूर्ण झाली आहेत. तज्ज्ञांकडून वारंवार मिळालेल्या इशाऱ्यांनंतर आणि शहरातील अलीकडील प्राणघातक भूस्खलनाच्या घटनांनंतरही, ३२९ ठिकाणी कामे एकतर प्रलंबित आहेत किंवा अद्याप सुरू झालेली नाहीत. भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण संस्थेने २०१८ मध्ये मुंबईतील भूस्खलनप्रवण क्षेत्रे आणि लगतच्या मानवी



वस्त्यांचा वर्षभर अभ्यास केल्यानंतर या सुरक्षा उपायांची शिफारस केली होती. मुंबईत प्रत्येक मान्सूनमध्ये भूस्खलनाचा गंभीर धोका कायम असतो. महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या आकडेवारीनुसार, २०२१ ते २०२५ या काळात शहरात १०७ भूस्खलनांची नोंद झाली असून, त्यात ३१ जणांचा मृत्यू झाला आणि २५ जण जखमी झाले. सध्या, मुंबईत २४९ भूस्खलनप्रवण ठिकाणे आढळली आहेत, ज्यात १५० ते २०० मीटर उंचीच्या टेकड्या आणि डोंगररांगांचा समावेश आहे. यापैकी अनेक उतार खडकाळ, ओसाड किंवा भुसभुशीत मातीने आच्छादलेले आहेत, ज्यामुळे मुसळधार पावसात भूस्खलनाचा धोका अधिक असतो. अनेक ठिकाणे पूर्वीच्या खाणकाम क्षेत्रांमध्ये आहेत, जिथे उत्खननामुळे नैसर्गिक भूभाग बदलला आहे. या उतारांवर प्रामुख्याने झोपडपट्ट्या असून, तिथे कमी उत्पन्न असलेली कुटुंबे आणि स्थलांतरित मजूर राहतात. सरकारी अंदाजानुसार, या उच्च-जोखमीच्या भागांमध्ये अंदाजे १ लाख लोक राहतात. २४९ असुरक्षित ठिकाणांपैकी, ७४ ठिकाणे 'धोकादायक' आणि ४६ ठिकाणे 'अत्यंत धोकादायक' म्हणून वर्गीकृत केली आहेत. सर्वाधिक ११६ असुरक्षित स्थळे एस वॉर्डमध्ये (कांजूरमार्ग आणि विक्रोळी) आहेत.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई ( सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०१८.**

Email:- centralmumbai.ee@mahapwd.gov.in — **फोन : ४९३६४०४/ २४९३१९०२ फॅक्स : २४९३१९०२**

**जा.क्र.का.अ./ममुंवि/निविदा/२१६४** — **दिनांक : २१/०५/२०२६**

**ई निविदा सूचना क्रमांक ०२ सन (२०२६-२७)**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई ( सा.बां) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील मजूर सहकारी संस्था मर्यादित यांचेकडून ३९ कामांची ई-निविदा http://mahatenders.gov.in/http://mahapwd.gov.in मागवित आहेत. सर्व मजूर सहकारी संस्था, मुंबई जिल्हा यांनी प्रचलित नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| | |
|---|---|
| **ई-निविदा उपलब्ध कालावधी -** | दि. २७.०५.२०२६, सकाळी १५.०० पासून ते दि.०३.०६.२०२६ रोजी १५.०० पर्यंत |
| **ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास)** | दि.०४.०६.२०२६ रोजी १५.०० वाजता (कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा. बां) विभाग, यांचे कार्यालय, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ४०००१८) |

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**मध्य मुंबई (सा.बां) विभाग,**
**वरळी, मुंबई.**

आरओसी - 2026-27/क्र-5/C९३४

# पालघर सागरी हद्दीत ६१ दिवस मासेमारी बंदी; नियम मोडल्यास होणार कठोर कारवाई!

**पालघर (रघुनाथ कदम) :** पालघर (रघुनाथ कदम) : पालघर आणि ठाणे जिल्ह्यांच्या सागरी हद्दीत १ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत मासेमारीवर अधिकृत बंदी लागू करण्यात आली आहे. मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त दिनेश पाटील यांनी ही माहिती देत नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. दरवर्षी जून आणि जुलै महिन्यात समुद्रातील विविध माशांचा प्रजनन काळ सुरू असतो. या काळात मासेमारीवर निर्बंध घातल्याने मासळीच्या साठ्याचे संवर्धन होण्यास मदत होते. याशिवाय पावसाळ्यातील



वादळी हवामान, खवळलेला समुद्र आणि वेगवान वाऱ्यांमुळे मच्छीमारांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. बंदी कालावधीत सर्व प्रकारच्या यंत्रचलित आणि यांत्रिक नौकांना समुद्रात जाण्यास सक्त मनाई करण्यात आली असून, सर्व बोटी ३१ मेपूर्वी बंदरात परत आणण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र पारंपरिक पद्धतीने हँडलाईनच्या साहाय्याने मासेमारी करणाऱ्या बिगर-यंत्रचलित लहान नौकांना या बंदीतून सवलत देण्यात आली आहे. बंदीच्या काळात नियमांचे उल्लंघन करून समुद्रात गेलेल्या नौकेचा अपघात झाल्यास शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत किंवा नुकसानभरपाई दिली जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तसेच बेकायदेशीर मासेमारी रोखण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाकडून विशेष देखरेख ठेवण्यात येणार आहे. सुरक्षारक्षक आणि सागरमित्रांच्या मदतीने समुद्रात गस्त घालण्यात येणार असून पावसाळ्यात ड्रोनच्या माध्यमातून हवाई सर्वेक्षणही केले जाणार आहे. नियम मोडणाऱ्या मच्छीमारांच्या नौका, जाळी आणि पकडलेली मासळी जप्त करण्यात येईल. तसेच संबंधितांचा सरकारी डिझेल परवाना आणि अनुदान कायमस्वरूपी रद्द करण्याची कारवाईही होऊ शकते. दरम्यान, पालघर किनारपट्टीवरील सातपाटी, डहाणू, एडवण आणि वसई परिसरातील मच्छीमारांनी बंदीच्या काळात बोटींची देखभाल, जाळ्यांची दुरुस्ती आणि इंजिन दुरुस्तीची कामे हाती घेतली असून आगामी मासेमारी हंगामासाठी तयारी सुरू केली आहे.

# बैलगाडा संघटना ठरली देवदूत

## दुष्काळी भागासाठी पाठवले २०० पाण्याचे टँकर

**ठाणे (विशाल कारंडे) :** मुरबाड तालुक्यातील भीषण पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय बैलगाडा संघटनेने सामाजिक बांधिलकी जपत मोठा निर्णय घेतला आहे. पाणीटंचाईग्रस्त गावांसह आदिवासी पाड्यांसाठी तब्बल २०० पाण्याचे टँकर उपलब्ध करून देण्याचा संकल्प संघटनेने जाहीर केला असून या उपक्रमाला सर्व स्तरांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. संघटनेच्या माध्यमातून आदिवासी पाड्यांवर टँकर पोहोचण्यास देखील सुरुवात झाली आहे. उन्हाच्या तीव्र झळांमुळे मुरबाड तालुक्यातील अनेक गावांमध्ये आणि दुर्गम आदिवासी वाड्यांवर पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. महिलांना आणि ग्रामस्थांना पाण्यासाठी अनेक किलोमीटरची पायपीट करावी लागत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन अखिल भारतीय बैलगाडा संघटनेने पुढाकार घेत मदतीचा हात पुढे केला आहे. संघटनेच्या वतीने ठाणे, रायगड, पालघर आणि मुंबई जिल्ह्यातील बैलगाडा मालक, चालक, शौकिन, व्यावसायिक आणि बैलगाडा प्रेमी बांधवांना या सामाजिक उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, संघटनेने जाहीर केलेल्या मदतीनंतर काही भागांमध्ये पाण्याचे टँकर पोहोचण्यासही सुरुवात झाली असून आदिवासी पाड्यांवरील नागरिकांना त्याचा दिलासा मिळू लागला आहे. बैलगाडा शर्यतींसाठी ओळखली जाणारी संघटना आता सामाजिक कार्यातही पुढाकार घेत असल्याने या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. "पाणी हेच जीवन" हा संदेश देत तहानलेल्या गावांना मदत करण्यासाठी उभारलेला हा उपक्रम समाजापुढे एक आदर्श निर्माण करणारा ठरत आहे. पाणी टंचाईसारख्या गंभीर प्रश्नावर केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीत उतरलेली बैलगाडा संघटना ग्रामीण भागासाठी आशेचा किरण ठरत असून, आगामी काळात आणखी नागरिक आणि संस्था या मोहिमेत सहभागी होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मुरबाडच्या तहानलेल्या भूमीला दिलासा देण्यासाठी उचललेले हे पाऊल सामाजिक ऐक्य आणि लोकसहभागाचे उत्तम उदाहरण मानले जात आहे.

# जिल्हा परिषद शाळेत अनधिकृत फेरीवाल्यांकडून मालाची साठवणूक

**वसई (सुचिता देशमुख) :** विरार येथील भुयारी मार्गाजवळ (सबवे) असलेल्या जिल्हा परिषद उर्दू माध्यम शाळेच्या आत अनधिकृत फेरीवाल्यांकडून माळ साठवला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मराठी एकीकरण समितीच्या अधिकृत पेजवरून हा व्हिडिओ शेअर करण्यात आला असून या व्हायरल व्हिडिओमुळे प्रशासनाचा गलथान कारभार पुन्हा एकदा उजेडात आला आहे. वसई विरार शहरात मागील काही वर्षात रस्त्यावर सामानाची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांच्या संख्येत वाढ झाली असल्यामुळे रस्ते, रेल्वे स्थानक तसेच वर्दळीच्या भागात बस्तान मांडणाऱ्या फेरीवाल्यांचा





प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे वारंवार केल्या जाणाऱ्या तक्रारींमुळे पालिकेकडून या फेरीवाल्यांवर अधूनमधून कारवाई करण्यात येते. या कारवाई दरम्यान फेरीवाल्यांकडील सामान जप्त करण्यात येते. त्यामुळे कारवाईतून वाचण्यासाठी आणि माल सुरक्षित ठेवण्यासाठी अनेकदा फेरीवाले विविध ठिकाणी स्वतःकडचे सामान लपवून ठेवतात. पण, आता चक्क या फेरीवाल्यांकडून विक्रीचे सामान साठवण्यासाठी विरारमधील उर्दू माध्यम जिल्हा परिषद शाळेच्या जागेचा वापर केला जात आहे. एकीकडे शहरातील जिल्हापरिषद शाळांची अवस्था बिकट असताना दुसरीकडे त्या आता माल साठवणुकीसाठी त्याचा वापर केला जात असल्यामुळे महापालिका, जिल्हापरिषद आणि शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मराठी एकीकरण समितीच्या अधिकृत पेजवरून हा व्हिडिओ व्हायरल करण्यात आला असून, "विरार भुयारी मार्गाजवळील जिल्हा परिषद उर्दू माध्यम शाळेत परप्रांतीय अनधिकृत फेरीवाल्यांचा माल साठवला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. शैक्षणिक संस्थांचा अशा प्रकारे गैरवापर होत असेल, तर प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी", अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# अतिक्रमण, अवैध राडारोड्यावर सिडकोची धडक कारवाई

**नवी मुंबई (धनश्री सट्टा)** :नवी मुंबईतील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे आणि अवैध राडारोडा टाकण्याच्या प्रकारांविरोधात सिडको महामंडळाने धडक कारवाई सुरूच ठेवली असून २५ व २६ मे रोजी विविध भागांत मोठी मोहीम राबविण्यात आली. बेलापूर, ऐरोली आणि खारघर येथे अनधिकृत बांधकामे व झोपड्या हटविण्याची कारवाई करण्यात आली, तर दुसरीकडे सिडकोच्या दक्षता विभागाच्या भरारी पथकाने तीन वेगवेगळ्या ठिकाणी अवैध राडारोडा टाकणारे तीन डंपर पकडून चालकांविरोधात तीन पोलीस ठाण्यांत फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. सिडकोच्या अनधिकृत बांधकाम विभागाने २६ मे रोजी बेलापूर नोडमध्ये सेक्टर १९/२० मधील भूखंड क्रमांक एनए-११९, एनए-१२१, एनए-



१३० आणि एनए-१३१ येथील सिडकोच्या अधिसूचित जागेवर सुरू असलेली आरसीसी प्लिंथ स्वरूपातील अनधिकृत बांधकामे हटविली. या कारवाईसाठी पोकलेन, जीप आणि कामगारांची मदत घेण्यात आली.ऐरोली नोडमध्येही त्याच दिवशी मोठी कारवाई करण्यात आली. सेक्टर १ मधील सर्व्हे क्रमांक २६८ ते २७१ या संपादित जागेवरील तळमजल्याच्या अनधिकृत बांधकामाचे नऊ स्लॅब ब्रेकरच्या सहाय्याने पाडण्यात आले. या मोहिमेत अतिक्रमण विभाग, पोलीस, महावितरण आणि सुरक्षा यंत्रणांचा सहभाग होता. खारघरमध्ये सेक्टर ८ आणि ११ मधील सुमारे ६ हजार चौरस मीटर क्षेत्रावरील ११५ झोपड्यांचे बांधकाम जमीनदोस्त करण्यात आल्या. तसेच सेक्टर ३६ मधील एका भूखंडावरील पत्र्याचे अनधिकृत कुंपण आणि १२ व्यावसायिक स्टॉलही हटविण्यात आले.२५ मे रोजी सिडकोच्या भरारी पथकाने पनवेल, खारघर आणि न्हावा परिसरात अवैधरीत्या राडारोडा (डेब्रीज) टाकणाऱ्या तीन डंपरवर कारवाई केली. संबंधित डंपर चालकांकडून सिडकोच्या जागांवर परवानगीशिवाय राडारोडा टाकला जात असल्याचे आढळून आले. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम २७१ अन्वये पनवेल, खारघर आणि न्हावा-शेवा पोलीस ठाण्यांत स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून डंपर जप्त करण्यात आले आहेत. सिडकोच्या मुख्य दक्षता अधिकारी सूरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार आणि सिडकोचे अनधिकृत बांधकामे विभागाचे मुख्य नियंत्रक विशाल ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली या सर्व कारवाया राबविण्यात आल्या आहेत. शहरातील सिडकोच्या जागांवरील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे आणि पर्यावरणाला हानी पोहोचविणाऱ्या राडारोडा टाकण्याच्या प्रकारांविरोधात पुढील काळातही अशी मोहीम सुरू राहणार असल्याचे सिडको प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# महसूल खात्यातील भ्रष्टाचार उघड वीस हजारांची लाच घेताना अधिकारी अटकेत


**उल्हासनगर (गणेश बागडे)** : महसूल विभागातील भ्रष्टाचाराचा आणखी एक प्रकार उघडकीस आला असून सातबारा फेरफार मंजूर करण्यासाठी तब्बल २० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या ग्राम महसूल अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडले. या कारवाईमुळे



महसूल विभागात खळबळ उडाली असून लाचखोर अधिकाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ईश्वर बद्रीनाथ जाधव (वय ५६), ग्राम महसूल अधिकारी, द्वारली-ढोकळी असे अटक करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव आहे. तक्रारदाराच्या वडिलांच्या निधनानंतर त्यांच्या सावत्र बहिणीचे नाव वारस म्हणून सातबारावर नोंदवून फेरफार मंजूर करण्यासाठी जाधव यांनी स्वतःसाठी १० हजार रुपये आणि मंडल अधिकाऱ्यासाठी १० हजार रुपये अशी एकूण २० हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. याबाबत तक्रारदाराने २९ मे रोजी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. एसीबीने तक्रारीची पडताळणी केली असता लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी सापळा रचला. शुक्रवारी दुपारी द्वारली येथील तलाठी कार्यालयात तक्रारदाराकडून २० हजार रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारताना ईश्वर जाधव यांना एसीबीच्या पथकाने रंगेहात पकडले. कारवाईदरम्यान आरोपीकडून लाचेची रक्कम जप्त करण्यात आली असून त्यांचा मोबाईल फोनही तपासासाठी ताब्यात घेण्यात आला आहे. या प्रकरणी उल्हासनगरच्या हिललाईन पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपीच्या घराची झडतीही घेण्यात येत आहे. पोलिस उपअधीक्षक अनिल जयकर यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक विनोद जाधव, सुनील केदार, रेखा शिंदे आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीपणे पार पाडली.

# कल्याण पूर्व चिंचपाडा, माणेरे भागात बेसुमार बेकायदा चाळींची उभारणी

**कल्याण (आकाश कांबळे)** : कल्याण पूर्वेतील चिंचपाडा, माणेरे परिसरात भूमाफियांनी या भागातील मोकळ्या जमिनींवर बेकायदा चाळी उभारण्याचा सपाटा लावला आहे. या भागातील बहुतांशी जमिनी सरकारी, गुरचरण, वन विभागाच्या असताना या बेकायदा चाळींवर कल्याण डोंबिवली पालिकेच्या अधिकाऱ्यांसह संबंधित जमिनीच्या शासकीय मालक संस्था कारवाई करत नसल्याने नागरिकांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. टिटवाळा मांड्यानंतर बेकायदा चाळी उभारणीचे पालिका हद्दीतील दुसरे ठिकाण हे चिंचपाडा, माणेरे असल्याचे उघड झाले आहे. या बेकायदा चाळींमुळे पावसाळी पाण्याचे मार्ग बंद केले जात आहेत. उल्हासनगर शहराकडून येणारे पावसाचे पाणी, चिंचपाडा, माणेरे, आशेळे



भागातून पावसाचे वाहून जाणारे पाणी या बेकायदा चाळींमुळे अडेल अशा पध्दतीने या बेकायदा चाळी माफिया उभारत आहेत. स्थानिक शासकीय, पालिकेच्या यंत्रणा या बेकायदा चाळींच्या पाठीराख्या असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. या बेकायदा चाळींविषयी अनेक तक्रारी स्थानिक जागरूक नागरिकांनी पालिककडे केल्या आहेत. पण त्याची दखल घेतली जात नसल्याचे तक्रारदारांनी सांगितले. पालिका आयुक्त, अतिक्रमण नियंत्रण उपायुक्तांनी चिंचपाडा, माणेरे परिसरात अचानक दौरा करून या बेकायदा चाळींची पाहणी करावी आणि एक दिवस मोठी तोडकाम मोहीम राबवून या सर्व बेकायदा चाळी एक ते दोन दिवसाच्या मोहिमेत जमीनदोस्त करून भूमाफियांना दणका देण्याची नागरिकांची मागणी आहे. एक बेकायदा चाळ भूमाफिया दोन दिवसात उभारतात. एका चाळीत आठ किंवा १२ खोल्या असतात. एक खोलीमागे स्थानिक यंत्रणांना ६० ते ७० रूपये भूमाफियांकडून वाटप केले जाते. एक खोली भूमाफिया घर खरेदीदारांना नोटरी पध्दतीने पाच ते सहा लाखांना विकतो. या बेकायदा चाळींना पालिकेच्या मुख्य जलवाहिनींवरून चोरीच्या नळ जोडण्या घेतल्या जातात. महावितरणचे कर्मचारी, अधिकारी या बेकायदा चाळींच्या कागदपत्रे, त्यांची ठिकाणे याची शहानिशा न करता नागरिकांचा मुलभूत हक्क या कलमाने या बेकायदा चाळींना वीज मीटर देतात. तर काही रहिवासी, भूमाफिया या चाळींना रात्रीच्या वेळेत विजेच्या खांबांवरून चोरून वीज पुरवठा घेतात. या बेकायदा चाळींच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात पाणी चोरी होते. पालिकेला बांधकाम परवानगीच्या माध्यमातून एक पैशाचा महसूल मिळत नाही. या बेकायदा चाळींमुळे परिसरातील पाणी वाहून जाण्याचे मार्ग बंद होत असल्याने नव्या अडचणींची भर स्थानिक भागात पडत आहे. आय प्रभागाच्या तत्कालीन साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी चिंचपाडा भागातील ५०० हून अधिक बेकायदा चाळी, ३०० हून अधिक जिन्स कारखाने जमीनदोस्त केले होते. मुंबरकर यांची या प्रभागातून बदली होताच आणि त्यानंतर आलेल्या साहाय्यक आयुक्तांनी या बेकायदा बांधकामांकडे दुर्लक्ष केल्याने चिंचपाडा परिसर बेकायदा चाळींचे आगर बनला आहे. काही दिवसापूर्वी आय प्रभागाचे अधीक्षक राजेंद्र साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली या भागातील बेकायदा चाळी जमीनदोस्त करण्यात आल्या होत्या. या चाळींची पाहणी करून त्या जमीनदोस्त करण्याची कार्यवाही केली जाईल, असे साळुंखे यांनी सांगितले.

# साठेबाजी-काळाबाजारावर प्रशासनाची करडी नजर; ठाणे जिल्ह्यात कोणत्याही क्षणी होणार पेट्रोलपंपांची पाहणी

**ठाणे (तृप्ती गोरे) :** ठाणे जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे. जिल्ह्यात इंधनाचा तुटवडा भासू नये आणि त्याचा काळाबाजार रोखला जावा, यासाठी प्रशासनाने आता अत्यंत कडक पावले उचलली असून कोणत्याही क्षणी पेट्रोल पंपाची तपासणी केली जाणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रूपाली भालके, एचपीसीएल, बीपीसीएल, आयओसीएल या प्रमुख तेल कंपन्यांचे डेपो मॅनेजर, विभागीय विक्री अधिकारी, तसेच रिलायन्स जिओ आणि नायरा पेट्रोल पंपांचे प्रतिनिधी व वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांची एक महत्त्वाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत जिल्ह्यातील इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सध्या ठाणे जिल्ह्यात सर्व कंपन्यांचा मिळून एकूण ३ हजार २६० किलो लिटर पेट्रोल आणि १ हजार ३८८ किलो लिटर डिझेलचा साठा उपलब्ध आहे. सर्व संबंधित डेपोमधून नियमित पुरवठा सुरू असल्याने नागरिकांनी घाबरून जाण्याचे किंवा



इंधनाचा अनावश्यक साठा करण्याचे कोणतेही कारण नाही. इंधनाचा काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी पेट्रोल पंपांना स्पष्ट निर्देश दिले आहेत. आता पंपांवर वाहनाशिवाय प्लास्टिक ड्रम, कॅन किंवा बॉटलमध्ये इंधन मागणाऱ्या ग्राहकांची संपूर्ण माहिती एका विशेष नोंदवहीत ठेवावी लागणार आहे. यामध्ये ग्राहकाचे नाव, मोबाईल नंबर, ओळखपत्र, इंधन घेण्याचे कारण, वापराचे ठिकाण आणि मोबाईलमधील फोटो यांसारख्या नोंदी जतन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. दुसरीकडे, विविध महत्त्वाच्या संस्था व कामांसाठी पूर्वीप्रमाणेच सुरळीत इंधन पुरवठा व्हावा यासाठीही नियोजन करण्यात आले आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था, औद्योगिक कंपन्या, शासकीय बांधकाम उपक्रम, मेट्रो आणि एमएसआरडीसी यांच्याकडून जिल्हा कार्यालयाकडे पत्रांद्वारे मागणी केली जात आहे. अशा संस्थांना त्यांच्या गरजेनुसार आणि मागील वापराचा विचार करून पेट्रोल व डिझेल दिले जाईल. यासाठी गृहनिर्माण संस्थांकडून मागणी पत्र, शेतकऱ्यांकडून ७/१२ आणि शासकीय काम करणाऱ्या संस्थांकडून वर्क ऑर्डर घेऊन त्यांना पूर्वीसारखाच इंधन पुरवठा करण्याचे आदेश पेट्रोल पंप चालकांना देण्यात आले आहेत. साठेबाजीला लगाम घालण्यासाठी ठाणे जिल्ह्यात मोठी कारवाई सुरू झाली आहे. कळवा आणि शहापूर तालुक्यातील कसारा येथे डिझेलचा बेकायदेशीर साठा आढळून आल्याने गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. भविष्यात असा प्रकार घडू नये म्हणून सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस विभाग आणि तेल कंपन्यांचे सेल्स ऑफिसर यांचे संयुक्त दक्षता पथक तयार करण्यात आले आहे.हे पथक पेट्रोल पंपांची अचानक तपासणी करेल. तसेच ठाणे शहर, नवी मुंबई, मिरा भाईंदरचे पोलीस आयुक्त आणि ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात पेट्रोल-डिझेलच्या टँकरची तपासणी करण्यासाठी विशेष पथके नेमण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई ( सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०१८.**

Email:- centralmumbai.ee@mahapwd.gov.in — **फोन : ४९३६४०४ फॅक्स : २४९३१९०२**

**जा.क्र.का.अ./ममुंवि/ई-निविदा/२२०१** — **दिनांक : २२/०५/२०२६**

**ई निविदा सूचना क्रमांक ०३ सन (२०२६-२७)**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई ( सा.बां) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील मजूर सहकारी संस्था मर्यादित यांचेकडून ३० कामांची ई-निविदा http://mahatenders.gov.in/http://mahapwd.gov.in मागवित आहेत. सर्व मजूर सहकारी संस्था, मुंबई जिल्हा यांनी प्रचलित नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई ( सा.बां) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| | |
|---|---|
| **ई-निविदा उपलब्ध कालावधी -** | दि.०१.०६.२०२६, सकाळी १५.०० पासून ते दि.०८.०६.२०२६ रोजी १५.०० पर्यंत |
| **ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास)** | दि.०९.०६.२०२६ रोजी १५.०० वाजता (कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, यांचे कार्यालय, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ४०००१८) |

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**मध्य मुंबई (सा.बां) विभाग,**
**वरळी, मुंबई.**

आरओसी - 2026-27/क्र-5/C961

# साताऱ्यात शिवसेना आमदारांच्या निवासस्थानी भाजप सदस्यांची रेलचेल

**साताारा (महेश पानसरे) :** सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य फोडून भाजपने सत्ता हस्तगत केली आहे. यामध्ये शिवसेनेचे कोरेगावचे आमदार महेश शिंदे यांचाही सहभाग असल्यामुळे खटाव येथील त्यांच्या निवासस्थानी झालेल्या स्नेहभोजन समारंभाला शिवसेना सदस्यांनी पाठ फिरवली आहे. शिवसेना आमदारांच्या निवासस्थानी भाजप सदस्यांची रेलचेल पाहून आगामी निवडणुकीत शिवसेनेचा उमेदवार कोरेगाव मतदार संघात बदलण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. खटाव येथे शिवसेनेचे कोरेगाव आ .महेश शिंदे व सातारा जिल्हा परिषदेच्या भाजप अध्यक्षा सौ.प्रियाताई शिंदे यांच्या निवासस्थानी स्नेहभोजन व संवाद



बैठकी संपन्न झाली. सातारा जिल्ह्यातील प्रलंबित विकास झपाट्याने करण्यासाठी काही सातारा जिल्हा परिषद भाजप सदस्यांनी उपयुक्त सूचना मांडल्या. या बैठकीला शिवसेनेचे जिल्हा परिषद सदस्य व नेते गैरहजर राहिले होते. राजकीय पक्षाचा व्हिप डावलल्याने या प्रकरणाची तक्रार करण्यात आलेली आहे. त्याची सुनावणी साताराचे जिल्हाधिकारी यांच्यासमोर होत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत तक्रार दाखल केलेल्या जिल्हा परिषद सदस्यांना सातारा सांगली स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार आहे का? याची चर्चा सुरू झालेली आहे. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीच्या निकालानुसार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे २० आणि शिवसेनेकडे १५ सदस्य संख्या आहे. या निवडणुकीत भाजप २७ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला होता, परंतु राष्ट्रवादी आणि शिवसेनेने एकत्रित येऊन बहुमताची जुळवाजुळव करत सत्ता स्थापन केली आहे. या प्रसंगी खटाव येथील आ. महेश शिंदे व भाजप जिल्हा परिषद अध्यक्ष सौ प्रियाताई शिंदे यांच्या निवासस्थानी भाजपचे श्रीमंत छत्रपती खासदार उदयनराजे भोसले, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, माजी खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर, आ. मनोज घोरपडे, फलटणचे आमदार सचिन पाटील, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ, जि प सदस्य शिवदास, माजी भाजप जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम,सत्यजित पाटणकर, जिल्हा परिषद उपाध्यक्ष श्री.राजू भोसले. सुनिल काटकर, काका धुमाळ, विनीत पाटील, श्री.सचिन नलवडे तसेच जिल्हा परिषदेच्या विविध समित्यांचे सभापती, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य तसेच प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. दिनांक ९ फेब्रुवारी रोजी सातारा जिल्हा परिषदेचा निकाल लागला होता. व २० मार्च रोजी निवडी झाल्या होत्या. यातील अनेक सदस्यांना सहलीला घेऊन गेले होते. त्यांना थेट जिल्हा परिषद सभागृहात आणला असताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन सदस्यांना पोलिसांनी उचलल्यामुळे मतदान करता आले नाही. त्याची संपूर्ण महाराष्ट्रात चर्चा होत आहे. त्यामुळे बुंद से गयी वो हौद से नही आती.. असं त्याचे वर्णन होत आहे.

# पाणीपुरवठ्याच्या ठेकेदाराला १० लाख रुपयांचा दंड!

**पुणे (अभिजीत येरल्लू) :** समान पाणी पुरवठा योजनेच्या रस्ता दुरुस्तीचे काम निकृष्ट केल्याने महापालिकेने संबधित ठेकेदाराला १० लाख रुपयांचा दंड केला आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी प्रत्यक्ष जागा पाहणी केल्यानंतर ही कारवाई केली. धायरी भागात सुरू असलेल्या कामासाठी हा दंड ठोठावण्यात आला. धायरी येथील उंबऱ्या गणपतीच्या परिसरात दोन महिन्यांपूर्वी समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जलवाहिनी टाकण्यात आली. मात्र, ठेकेदाराकडे सिमेंट काँक्रिट नसल्याने हा रस्ता न बुजविता तसाच सोडून देण्यात आला. चार दिवसांपूर्वी रात्री सिमेंट काँक्रिट उपलब्ध झाल्याने ठेकेदाराने खोदलेला रस्ता पूर्ववत केला. त्यावरून वाहने जाऊ नयेत, सिमेंट सुकावे यासाठी ठेकेदाराने कोणतीही उपाययोजना केल्या नाहीत. त्यामुळे पुढील अवघ्या काही तासांत सिमेंट निघण्यास सुरुवात झाली. या बाबत महापालिका आयुक्तांकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या. या तक्रारींची शहानिशा करण्यासाठी रविवारी सकाळी महापालिका आयुक्त राम यांच्यासह अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी धायरी परिसरातील या कामाची पाहणी केली. त्या वेळी खोदलेला रस्ता दुरुस्त करण्यासाठी चांगल्या दर्जाच्या




साहित्याचा वापर करण्यात आला नसल्याचे समोर आले. गेल्या काही वर्षांपासून शहरातील विविध भागात समान पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे. काही भागातील काम पूर्ण झाले असून काही भागात हे काम सुरू आहे. सिमेंट काँक्रिटवर ठेकेदाराने पोते झाकले होते. आयुक्त राम यांच्या समोर हे पोते उचलल्यानंतर कामाची पोलखोल झाली. अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी स्वतः सिमेंट काँक्रिटीकरण व्यवस्थित केले नसल्याचे हात लावून पाहिले. त्यानंतर महापालिका आयुक्त राम यांनी जागेवरूनच पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांना फोन करून हे काम निकृष्ट झाले आहे. ठेकेदाराला १० लाख रुपयांचा दंड लावा असे आदेश दिले. गेल्या काही दिवसांपासून या भागात हे काम सुरू आहे.

# FDA मोहिमेचा दणका! ठाण्यातून ७ लाखांचा भेसळयुक्त अन्नसाठा जप्त

**ठाणे (तृप्ती गोरे) :** जिल्ह्यात नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या अन्न व्यावसायिकांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठी धडक कारवाई केली आहे. जिल्ह्यात २७ मे रोजी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत विविध ठिकाणी छापे टाकून तब्बल ७ लाख ३० हजार रुपयांहून अधिक किमतीचा भेसळयुक्त आणि निकृष्ट दर्जाचा अन्नसाठा जप्त करण्यात आला. याशिवाय प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री केल्याप्रकरणी सहा जणांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून सुमारे साडेचार लाख रुपयांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे उल्लंघन होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर एफडीएच्या पथकाने ठाणे जिल्ह्यातील विविध अन्न आस्थापनांवर छापेमारी केली. या कारवाईदरम्यान भेसळयुक्त आणि खराब दर्जाचे खाद्यपदार्थ, अयोग्य पद्धतीने साठवलेले साहित्य तसेच नियमांचे उल्लंघन करणारा मोठा अन्नसाठा आढळून आला. यामध्ये अधिकाऱ्यांनी १ लाख ४९ हजार ७२४ रुपयांचे खाद्यतेल, ९३ हजार ८३० रुपयांचे फरसाण, २ लाख ६ हजार ८०० रुपयांचे तूप, ८ हजार १९० रुपयांचे हक्का नुडल्स, १७ हजार १०० रुपयांची ताडी, ५४ हजार ९६ रुपयांचे शरबत आणि १ लाख ९७ हजार ६४० रुपये किमतीचा डिंक (गम अरेबिक) असा एकूण लाखो रुपयांचा साठा जप्त केला. दरम्यान, प्रतिबंधित अन्न पदार्थांची विक्री आणि साठा केल्याप्रकरणी पोलिसांनी सहा आरोपींविरोधात गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली. या कारवाईत ४ लाख ५३ हजार ३४४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, संबंधितांविरोधात पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. अन्न व औषध प्रशासनाने सर्व अन्न व्यावसायिकांना अन्न सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्याचा इशारा दिला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसून, भेसळयुक्त किंवा निकृष्ट अन्नपदार्थ विक्री करणाऱ्यांविरोधात यापुढेही अशाच धडक कारवाया सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांना अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत किंवा भेसळीबाबत तक्रार असल्यास त्यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या १८००२२२३६५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा किंवा वागळे इस्टेट येथील सह आयुक्त कार्यालयात तक्रार नोंदवावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# मालेगावात ५ महिन्यांत हजारावर गोवंश जनावरांना जीवदान; २५७ तस्करांवर गुन्हे दाखल!

**नाशिक (सचिन कदम) :** मालेगाव पोलीस परिमंडळात गेल्या पाच महिन्यांच्या कालावधीत राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत पोलिसांना गोवंश जनावरांची वाहतूक व कत्तल रोखण्यास उल्लेखनीय यश आले आहे. या कालावधीत जवळपास हजारावर गोवंश जनावरांचा जीव वाचविण्यात यश आले असून या संदर्भात १५५ प्रकरणांमधील २५७ जणांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मालेगावचे अप्पर पोलीस अधिक्षक सूरज गुंजाळ यांनी ही माहिती दिली. राज्यात गोवंश हत्येला कायद्याने बंदी घालण्यात आली आहे. मात्र, अनेक गोतस्कर अवैध कत्तलीच्या हेतूने गोवंश जनावरांची वाहतूक करीत असल्याच्या तक्रारी प्राप्त



होत आहेत. त्यानुसार मालेगाव पोलिसांकडून व्यापक प्रमाणात मोहिम राबवली जात आहे.या मोहिमेचा भाग म्हणून गेल्या पाच महिन्यात जवळपास एक हजार जनावरांची कसायांच्या ताब्यातून सुटका करण्यात आली. तसेच अशा कारवायांदरम्यान जनावरांची बेकायदेशीर वाहतूक करणारी ११० वाहनेही पोलिसांनी जप्त केली आहेत. या मोहिमेत सर्वाधिक ३७ गुन्हे मालेगाव तालुका पोलीस ठाण्यातंतर्गत नोंदविण्यात आले आहेत. तालुका पोलिसांनी कत्तलीसाठी जाणारे २३७ गोवंश जनावरे जप्त करत ४८ जणांविरूध्द गुन्हे दाखल केले आहेत. या गुन्ह्यांत वापरण्यात आलेली ३७ वाहने पोलिसांनी जप्त केली आहेत. तर,मालेगाव शहर व उपविभागात करण्यात आलेल्या कारवाईत ७१ गोतस्करांवर गुन्हे दाखल करून ३०१ गोवंश जनावरांची पोलिसांनी सुटका केली आहे. यात जनावरांची अवैध वाहतूक करणारी २४ वाहने हस्तगत करण्यात आली असून, ९५ सराईतांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अप्पर पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या विशेष पोलीस पथकासह परिमंडळातील उपविभागीय पोलीस अधिकारी सिध्दार्थ बारवाल, दर्शन दुग्गड, तसेच शहर, किल्ला, आयेशानगर, आझादनगर, पवारवाडी, तालुका, कॅम्प आणि छावणी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, दुय्यम अधिकारी व पोलीस अंमलदारांनी या मोहिमेत सहभाग नोंदवला. बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर शहरात गोवंश जनावरांची अवैध कत्तल रोखण्यासाठी पोलिसांकडून विशेष खबरदारी घेतली गेली. शहराच्या सर्व प्रमुख रस्त्यांवर पोलीस पथकाचा अहोरात्र पहारा ठेवण्यात आला. तसेच वेगवेगळ्या दहा ठिकाणी तपासणी नाके उभारून संशयास्पद वाहनांची कसून झडती घेण्यात आली. याशिवाय शहरात विविध ठिकाणी छापे टाकून कत्तलीच्या हेतूने डांबून ठेवण्यात आलेल्या गोवंश जनावरांची पोलिसांनी सुटका करत त्यांना संगोपनासाठी गोशाळेकडे सुपूर्द केले. दरम्यान,अवैध व्यवसाय, गुन्हेगारी प्रवृत्ती तसेच कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्या घटकांविरूध्द मालेगाव पोलीस प्रशासनाकडून यापुढेही अत्यंत कठोर कारवाई करण्यात येईल,असा इशारा अप्पर पोलीस अधीक्षक सूरज गुंजाळ यांनी दिला आहे.

# सीमाप्रश्नी महाराष्ट्र शासनाचा पाठपुरावा; कर्नाटक शासनाला विनंती – उदय सामंत

**कोल्हापूर (प्रथमेश चव्हाण) :** महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांकडून आज मराठी भाषकांच्या समस्या मागण्या, सर्वोच्च न्यायालयातील कामकाजासंदर्भात माहिती घेतली आहे. समितीच्या वतीने मुंबईत मुख्यमंत्र्यांसमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगितले असले तरी आपण त्यांना आंदोलन करू नये अशी विनंती केली आहे. लवकरच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांची बैठक आयोजित केली जाईल. त्याचबरोबर बेळगाव



सीमाभागातील मराठी भाषिकांवर जबरदस्ती करण्यात येऊ नये यासाठी आपण कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांशी जातीने संपर्क साधू विनंती करणार आहोत, अशी माहिती उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी बेळगाव येथे रविवारी पत्रकार दिली. मंत्री सामंत हे बेळगाव येथे कुणबी समाज बांधवांच्या कार्यक्रमाला आले असता आज रविवारी महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांनी त्यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन सादर केले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना मंत्री सामंत म्हणाले, आज मी या ठिकाणी समाज बांधवांच्या कार्यक्रमासाठी आलो आहे. कुणावर टीका करण्यासाठी नाही. सीमाप्रश्नाची आणि येथील मराठी भाषकांच्या समस्यांची शिवसेना नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना चांगली जाणीव आहे. सीमा आंदोलनात त्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला आहे. याची बेळगावातील मराठी भाषिकांनाही पुरेपूर माहिती आहे. शिंदे यांच्या बाबत मराठी भाषकांच्या मनात अत्यंत आदराची भावना असल्याचेही आज प्रकर्षाने दिसून आले. त्यामुळे महाराष्ट्र एकीकरण समितीने केलेल्या मागण्या संदर्भात मुंबईला गेल्याबरोबर मुख्यमंत्री फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याबरोबर चर्चा करणार आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसोबत महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांची लवकरच बैठक व्हावी यासाठी जातीने प्रयत्न करेन. बेळगाव येऊन वादग्रस्त वक्तव्य करून येथील मराठी भाषिकांना त्रास होईल असे काहीही बोलणार करणार नाही. लोकशाही पद्धतीने कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना बेळगाव सीमाभागातील मराठी भाषिकांवर होणाऱ्या त्रासाची जाणीव करून दिली जाईल. बेळगाव सीमाभागातील मराठी भाषिकांवर जबरदस्ती करू नये अशी विनंती करू. यासाठी दोन्ही राज्यांमध्ये समन्वय आवश्यक असल्याचेही सामंत यांनी सांगितले. बेळगाव सीमा प्रश्नसंदर्भात महाराष्ट्र शासनाने नेमलेले उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई हे दोन्ही समन्वय मंत्री बेळगाव येथील मराठी जनतेला येऊन भेटत नाहीत. याकडे लक्ष वेधले असता मंत्री सामंत म्हणाले, महाराष्ट्र शासनाने सीमा समन्वय मंत्र्यांची नेमणूक केली आहे. या मंत्र्यांना नजीकच्या काळात बेळगावला मी स्वतः जातीने घेऊन येणार आहे. त्याचबरोबर कर्नाटकात असलेल्या छत्रपती शहाजी महाराजांच्या समाधी स्थळाला भेट देणार आहे. समाधी स्थळाचा जीर्णोद्धार आणि विकास करण्यासंदर्भात महाराष्ट्र सरकारशी सविस्तर चर्चा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. उद्योग मंत्री उदय सामंत यांनी रविवारी बेळगावला भेट दिली. त्यांचे मराठी भाषकांनी स्वागत केले. या भेटीवर मंत्री सामंत यांनी एक्स वर प्रतिक्रिया नोंदवली आहे. त्यामध्ये सामंत यांनी म्हटले आहे की, आज बेळगाव भेटीदरम्यान 'महाराष्ट्र एकत्रीकरण समितीच्या' वतीने करण्यात आलेल्या आपुलकीच्या सत्काराने मन भारावून गेले. सीमाभागातील मराठी अस्मिता आणि संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी महाराष्ट्र एकत्रीकरण समितीने अविरतपणे दिलेला लढा आणि केलेले कार्य सर्वांसाठी सदैव प्रेरणादायी आहे. हा सत्कार म्हणजे केवळ माझा सन्मान नसून, महाराष्ट्र आणि सीमाभागातील मराठी भाषिकांमधील घट्ट नाते अधोरेखित करणारा क्षण आहे. सीमाभागातील मराठी माणसाची अस्मिता आणि बंधुभाव अधिक दृढ करण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत.

# वाढवण बंदर मोबदल्यातील ५० लाखांचा अपहार; आदिवासी शेतकऱ्याची फसवणूक

**पालघर (रघुनाथ कदम) :** वाढवण बंदर प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या मोबदल्यातून एका आदिवासी शेतकऱ्याची तब्बल ५० लाख २७ हजार रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शासनाकडून मिळणारा मोबदला लवकर मिळवून देण्याचे आमिष दाखवत काही दलालांनी शेतकऱ्याच्या बँक खात्याशी छेडछाड करून मोठी रक्कम परस्पर वळती केल्याचा आरोप समोर आला आहे. या प्रकरणामुळे वाढवण बंदर प्रकल्पातील भूमी संपादन प्रक्रियेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून स्थानिक आदिवासी समाजामध्ये संताप आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी डहाणू तालुक्यातील तवा गावातील रहिवासी किरण पालवा यांनी दिलेल्या तक्रारीवरून बोईसर पोलिसांनी सुरज गिंभल, धर्मा वळवी आणि प्रसाद उर्फ मॉन्टी पाटील या तिघांविरोधात फसवणूक, विश्वासघात आणि आर्थिक गैरव्यवहारासंदर्भातील विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी तपास सुरू केला असून या प्रकरणामागे आणखी कोणी सहभागी आहे का, याचाही शोध घेतला जात आहे. वाढवण बंदर हा देशातील महत्त्वाकांक्षी बंदर प्रकल्प मानला जात असून या प्रकल्पासाठी डहाणू परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत. तवा गावातील गट क्रमांक १७३ मधील सुमारे २.३० हेक्टर जमीनही या प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली होती. या जमिनीच्या बदल्यात शासनाकडून संबंधित शेतकऱ्यास जवळपास २ कोटी ९३ लाख रुपयांहून अधिक मोबदला मंजूर करण्यात आला होता. ही रक्कम बँक ऑफ महाराष्ट्रच्या कासा शाखेतील खात्यात जमा होणार होती. तक्रारीनुसार, आरोपींनी फिर्यादी किरण पालवा यांच्या निरक्षरतेचा आणि बँक व्यवहारांबाबत असलेल्या मर्यादित ज्ञानाचा फायदा घेतला. शासनाकडून मिळणारी मोबदल्याची रक्कम लवकर खात्यात जमा करून देतो तसेच आवश्यक सर्व प्रक्रिया पूर्ण करून देतो, असे आश्वासन देत त्यांनी पालवा यांचा विश्वास संपादन केला. यानंतर एप्रिल महिन्यात त्यांना बोईसर येथील एका खासगी बँकेत नेण्यात आले. तेथे विविध कागदपत्रांवर सह्या आणि अंगठ्याचे ठसे घेण्यात आले. फिर्यादींचा आरोप आहे की, या प्रक्रियेदरम्यान त्यांच्या बँक खात्याशी संबंधित मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडीमध्ये बदल करण्यात आला. त्यांच्या नकळत आरोपींनी स्वतःचे मोबाईल क्रमांक आणि ई-मेल खाते बँक खात्याशी जोडले. त्यामुळे खात्यातील व्यवहारांचे संदेश आणि माहिती थेट आरोपींकडे पोहोचू लागली. याच संधीचा फायदा घेत आरोपींनी मोबदल्याची रक्कम खात्यात जमा झाल्यानंतर विविध व्यवहारांच्या माध्यमातून तब्बल ५० लाख २७ हजार ६७० रुपये परस्पर काढून घेतल्याचा आरोप आहे. प्राथमिक तपासात या रकमेतून सोन्याचे दागिने खरेदी, कपड्यांची खरेदी तसेच इतर आर्थिक व्यवहार करण्यात आल्याचे समोर आले आहे. या व्यवहारांमधून आरोपींनी स्वतःचा आर्थिक लाभ करून घेतल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. यासंदर्भातील बँक व्यवहारांची सविस्तर माहिती तपास यंत्रणा गोळा करत आहे. या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, मोबदल्याची रक्कम खात्यात जमा होऊनही अनेक महिने संबंधित शेतकऱ्याला याची माहितीच नव्हती. खात्याशी जोडलेला मोबाईल क्रमांक बदलल्यामुळे कोणतेही व्यवहार संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचले नाहीत. काही काळानंतर खात्याच्या व्यवहारांची माहिती मिळाल्यानंतर रकमेतील मोठी तफावत लक्षात आली आणि फसवणुकीचा प्रकार उघड झाला. त्यानंतर पालवा यांनी संबंधित व्यक्तींना जाब विचारला. समाधानकारक उत्तर न मिळाल्याने त्यांनी अखेर पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. या घटनेमुळे वाढवण बंदर प्रकल्पासाठी जमीन दिलेल्या इतर शेतकऱ्यांमध्येही चिंता वाढली आहे. विशेषतः आदिवासी बांधवांमध्ये मोबदल्याच्या रकमेच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत.


**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे गोरेगाव,(पूर्व),मुंबई -४०००६५.**

**ई-निविदा सूचना क्रमांक ११ सन २०२६ -२०२७**

कार्यकारी अभियता, सा.बा. विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ योग्य कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब -२ नमुन्यातील निविदाई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावरwww.mahatenders.gov.inयेथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय, मुंबईच्या परळ परिसरातील महाविद्यालय इमारतीच्या परिरक्षणमहाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई येथे सभागृह इमारत व अतिथीगृह इमारत बांधकाम आणि बाह्य सुशोभिकरण करणे. | २२,०९,४१,३३९.०० |

**ई - निविदा वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा डाऊनलोड करण्यांचा कालावधी | दिनांक **२/०६/२०२६** रोजी **१५.००** पासून दिनांक **०९/०६/२०२६** रोजी **१५.००** पर्यंत. |
| २ | निविदा पुर्व बैठक | दिनांक **०५/०६/२०२६** रोजी **१५.००** वाजता मुख्य अभियंता यांचे कार्यालय,सा बां.प्रादेशिक विभाग बांधकाम भवन, मर्झबान पथ फोर्ट मुंबई-४००००१. |
| ३ | निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | दिनांक **१०/०६/२०२६** रोजी **१५.१५** वाजता (शक्य झाल्यास) अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय,मुंबई बांधकाम मंडळ, चेबूर,प्रशासकीय इमारत रेशनिंग ऑफिस चेंबूर, मुंबई-४०००७१. |

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
1. https://mahapwd.com
2. https://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यांत येईल.)
3.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई-४०००६५. कार्यालयातील सूचना फलक.

**जा. क्रं. साबांविप्र-आरे/नि.लि./ ७२ ८९**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६५.**
**दुरध्वनी क्रं. ०२२-२९२७२४४७**
**दिनांक:-** २६/५/२०२६

**कार्यकारी अभियंता**
**सा. बां. विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे, गोरेगाव, पूर्व, मुंबई-४०००६५.**

**आरओसी - 2026-27/क्र- 5/C९८२**

# ट्रोलिंगमुळे गर्भपात झाल्याचा अभिनेत्रीचा दावा; विजय यांच्या समर्थकांवर गंभीर आरोप

**वृत्तसंस्था :** अभिनेत्री आणि माजी नर्स मारी ज्युलियाना उर्फ ज्युली हिने तमिळ चित्रपटसृष्टीतील अभिनेता तसेच तमिळनाडूचे मुख्यमंत्री थलपती विजय यांच्या समर्थकांविरोधात गंभीर आरोप करत मोठी खळबळ उडवून दिली आहे. सोशल मीडियावरील ट्रोलिंग, बदनामी आणि मानसिक छळामुळे आपला गर्भपात झाल्याचा दावा करत तिने पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणामुळे तमिळनाडूच्या राजकीय आणि मनोरंजन क्षेत्रात चर्चांना उधाण आले आहे. २०१७ मधील जलीकट्टू आंदोलनादरम्यान प्रसिद्धीझोतात आलेली ज्युली 'बिग बॉस तमिळ' या लोकप्रिय रिॲलिटी शोमुळे घराघरांत पोहोचली होती. गेल्या काही महिन्यांपासून सोशल मीडियावर तिच्याविरोधात अपमानास्पद मोहिम राबवली जात असल्याचा आरोप तिने केला आहे. मार्च महिन्यात तिने पोलिसांकडे धाव घेत आठ जणांविरोधात अधिकृत तक्रार दाखल केली होती. या सर्व व्यक्ती विजय यांच्या 'तमिळगा वेत्री कझगम' (टीव्हीके) पक्षाचे समर्थक असल्याचा आरोपही तिने केला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना ज्युलीने सांगितले की, तिच्याविरोधात नियोजनबद्ध पद्धतीने बदनामी मोहीम राबवण्यात आली. सोशल मीडियावर तिच्याबाबत खोट्या कथा पसरवण्यात आल्या, तिच्या चारित्र्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आणि विविध प्रकारचे आरोप करण्यात आले. तिच्यावर तब्बल १५ लाख रुपयांच्या कथित किडनी घोटाळ्यात सहभागी असल्याचा



आरोप करण्यात आल्याचेही तिने सांगितले. या सर्व आरोपांमागे काही राजकीय समर्थक आणि एका वकिलाचा सहभाग असल्याचा दावा तिने केला. ज्युलीने आपल्या वैयक्तिक आयुष्यातील वेदनादायी अनुभवही सार्वजनिकपणे मांडला. नुकतेच लग्न झाल्यानंतर ती आणि तिचे पती त्यांच्या पहिल्या अपत्याची वाट पाहत होते. मात्र सततच्या ट्रोलिंगमुळे आणि मानसिक तणावामुळे तिला गंभीर मानसिक त्रास सहन करावा लागला. याच मानसिक धक्क्यामुळे आपला गर्भपात झाला, असा दावा तिने केला आहे."मी माझं बाळ गमावलं. हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा आघात आहे. सोशल मीडियावरील सततच्या अपमानामुळे आणि मानसिक छळामुळे मला प्रचंड त्रास झाला. मी सहानुभूती मिळवण्यासाठी हे सांगत नाही, पण माझ्याविरोधात आणि माझ्या पतीविरोधात ज्या प्रकारे अपमानास्पद भाषा वापरली गेली, ते अत्यंत वेदनादायी होतं," असे ज्युलीने भावूक होत सांगितले. तिने पुढे असा आरोप केला की, तिच्या तक्रारीकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. कारण तिने ज्या व्यक्तींविरोधात तक्रार केली आहे, त्या सर्वजण प्रभावशाली राजकीय गटाशी संबंधित आहेत. पत्रकार परिषदेत बोलताना तिने विजय यांचे नाव घेत त्यांच्यावर नैतिक जबाबदारीचा प्रश्न उपस्थित केला. "माझ्या गर्भपातासाठी विजय अण्णा जबाबदार आहेत," असे वक्तव्य करत तिने मोठा वाद ओढवून घेतला. मात्र याबाबत स्पष्टीकरण देताना तिने असेही म्हटले की, विजय यांनी थेट काही केले नसले तरी त्यांनी आपल्या समर्थकांना संयम बाळगण्याचे आवाहन केले असते तर परिस्थिती वेगळी असू शकली असती. "जर त्यांनी एक शब्द जरी बोलून त्यांच्या समर्थकांना मागे हटण्यास सांगितले असते, तर कदाचित मी आज जे गमावले आहे ते गमावले नसते," असे ती म्हणाली. ज्युलीच्या या आरोपांनंतर सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. काहींनी तिच्या वेदनांबद्दल सहानुभूती व्यक्त केली असून ऑनलाइन ट्रोलिंगविरोधात कठोर कारवाईची मागणी केली आहे. तर काहींनी तिच्या आरोपांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. दरम्यान, दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री अंबिका यांनीही या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत ज्युलीच्या आरोपांवर नाराजी व्यक्त केली. "तुझ्या गर्भपाताबद्दल मला खरोखर दुःख वाटते. मात्र त्यासाठी मुख्यमंत्री जबाबदार असल्याचे म्हणणे योग्य नाही. कोणत्याही व्यक्तीच्या आरोग्य समस्यांसाठी थेट राजकीय नेत्यांना जबाबदार धरणे चुकीचे आहे," असे त्यांनी म्हटले.अंबिका यांनी पुढे सार्वजनिक पदावरील व्यक्तींचा आदर राखण्याचे आवाहन केले. "मुख्यमंत्री असोत किंवा पंतप्रधान, त्यांच्या पदाचा सन्मान राखला गेला पाहिजे. मतभेद असू शकतात, पण भाषेची मर्यादा पाळणे आवश्यक आहे," असे त्यांनी नमूद केले. या प्रकरणामुळे सोशल मीडियावरील ट्रोलिंग, ऑनलाइन छळ आणि मानसिक आरोग्य या विषयांवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. डिजिटल युगात व्यक्तींना होणाऱ्या मानसिक त्रासाचे परिणाम किती गंभीर असू शकतात, याकडेही अनेकांनी लक्ष वेधले आहे. मात्र ज्युलीच्या आरोपांबाबत अद्याप विजय किंवा त्यांच्या पक्षाकडून अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. सध्या पोलिसांकडे दाखल तक्रारीची चौकशी सुरू असून संबंधित सोशल मीडिया खात्यांची आणि पोस्टची पडताळणी केली जात आहे. तपासानंतरच या प्रकरणातील वास्तव समोर येणार आहे. दरम्यान, ज्युलीच्या आरोपांमुळे तमिळनाडूच्या राजकारणात आणि चित्रपटसृष्टीत नव्या वादाला तोंड फुटले असून या प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आयपीएल विजेत्यांवर कोट्यवधींचा वर्षाव; विजेते, उपविजेते आणि प्लेऑफ संघांना घसघशीत बक्षीस


**वृत्तसंस्था :** क्रिकेटप्रेमींच्या उत्सुकतेचा कळस गाठणाऱ्या इंडियन प्रीमियर लीगच्या हंगामाचा समारोप अत्यंत रंगतदार वातावरणात झाला. अंतिम सामन्यापर्यंत रंगलेल्या चुरशीच्या लढतींनी चाहत्यांचे भरपूर मनोरंजन केले. विजेतेपदासाठी झालेल्या निर्णायक सामन्यानंतर केवळ ट्रॉफीच नव्हे, तर कोट्यवधी रुपयांच्या बक्षीस रकमेचीही चर्चा रंगू लागली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संघांसाठी आणि खेळाडूंसाठी मोठा बक्षीस निधी राखून ठेवला होता. त्यामुळे हंगामभर सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या संघांवर अक्षरशः पैशांचा वर्षाव झाला. स्पर्धेच्या अखेरीस विजेतेपद पटकावणाऱ्या संघाला प्रतिष्ठेची ट्रॉफी आणि मोठी रोख रक्कम प्रदान करण्यात आली. संपूर्ण स्पर्धेत दमदार खेळ, प्रभावी फलंदाजी, भेदक गोलंदाजी आणि अचूक संघनियोजनाच्या जोरावर जेतेपद मिळवणाऱ्या संघाने क्रिकेटविश्वात आपली वेगळी ओळख निर्माण केली. या यशाबद्दल संघाला तब्बल २० कोटी रुपयांचे बक्षीस देण्यात आले. ट्रॉफीसह मिळालेल्या या रकमेने संघ व्यवस्थापन, खेळाडू आणि चाहत्यांचा आनंद द्विगुणित झाला. अंतिम सामन्यात पराभव स्वीकारावा लागला असला तरी उपविजेत्या संघाने संपूर्ण हंगामात उत्कृष्ट कामगिरी केली. अनेक कठीण सामन्यांमध्ये विजय



मिळवत त्यांनी अंतिम फेरीपर्यंत मजल मारली होती. अंतिम टप्प्यात अपयश आले असले तरी त्यांच्या सातत्यपूर्ण प्रदर्शनाची दखल घेत त्यांना १३ कोटी रुपयांचे बक्षीस देण्यात आले. त्यामुळे ट्रॉफी हुकली असली तरी आर्थिकदृष्ट्या त्यांना मोठा लाभ झाला. प्लेऑफमध्ये स्थान मिळवणाऱ्या इतर संघांनाही भरीव आर्थिक पुरस्कार जाहीर करण्यात आले. अंतिम फेरीच्या उंबरठ्यावर पोहोचूनही विजेतेपदाच्या शर्यतीतून बाहेर पडलेल्या तिसऱ्या क्रमांकाच्या संघाला ७ कोटी रुपयांचे बक्षीस देण्यात आले. या संघाने संपूर्ण स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत अनेक बलाढ्य संघांना पराभूत केले होते. त्यामुळे त्यांच्या प्रयत्नांचेही कौतुक करण्यात आले. एलिमिनेटर सामन्यात पराभूत होऊन स्पर्धेबाहेर पडलेल्या चौथ्या क्रमांकाच्या संघालाही मोठी रक्कम देण्यात आली. प्लेऑफमध्ये प्रवेश मिळवणे हेच मोठे यश मानले जाते. त्यामुळे या संघाला सुमारे ६.५ कोटी रुपयांचे बक्षीस मिळाले. स्पर्धेतील अव्वल चार संघांमध्ये स्थान मिळवणाऱ्या प्रत्येक संघाला त्यांच्या कामगिरीनुसार आर्थिक लाभ देण्याची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली. आयपीएल ही केवळ संघांमधील स्पर्धा नसून वैयक्तिक गुणवत्तेलाही मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देणारी लीग म्हणून ओळखली जाते. त्यामुळे संपूर्ण हंगामात चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंनाही विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले. सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजाला प्रतिष्ठेची 'ऑरेंज कॅप' प्रदान करण्यात आली. हा पुरस्कार फलंदाजांच्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरीचा सन्मान मानला जातो. त्याचप्रमाणे सर्वाधिक बळी घेणाऱ्या गोलंदाजाला 'पर्पल कॅप' देण्यात आली. वेगवान गोलंदाज असो किंवा फिरकीपटू, संपूर्ण स्पर्धेत प्रतिस्पर्धी फलंदाजांवर वर्चस्व गाजवणाऱ्या गोलंदाजाला हा सन्मान मिळतो. या दोन्ही पुरस्कारांसोबत रोख रक्कम आणि विशेष सन्मानचिन्ह देण्यात आले. याशिवाय युवा प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी 'उदयास येणारा खेळाडू' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संपूर्ण हंगामात आपल्या कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेणाऱ्या नवोदित क्रिकेटपटूला हा सन्मान मिळाला. अनेक तरुण खेळाडूंनी यंदाच्या हंगामात दमदार प्रदर्शन करून भविष्यातील तारे म्हणून स्वतःची छाप पाडली. 'सर्वाधिक प्रभावी खेळाडू' हा पुरस्कारही विशेष चर्चेत राहिला. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही विभागांमध्ये प्रभाव टाकणाऱ्या खेळाडूची निवड या पुरस्कारासाठी करण्यात आली. त्याचबरोबर 'सर्वोत्तम आक्रमक फलंदाज' आणि इतर विशेष पुरस्कारही जाहीर करण्यात आले. या सर्व पुरस्कारांमुळे खेळाडूंना आर्थिक लाभाबरोबरच मोठी प्रतिष्ठाही मिळाली. आयपीएलच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे स्पर्धेचा आर्थिक स्तरही सातत्याने उंचावत आहे. प्रसारण हक्क, प्रायोजकत्व, तिकीट विक्री आणि डिजिटल माध्यमांमधून होणाऱ्या उत्पन्नामुळे स्पर्धेचा महसूल मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्याचा फायदा संघ, खेळाडू आणि क्रिकेटच्या पायाभूत विकासालाही होत आहे. यंदाच्या हंगामातही चाहत्यांनी मैदानांवर आणि डिजिटल माध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. अंतिम सामन्यापासून पुरस्कार वितरण सोहळ्यापर्यंत प्रत्येक क्षण क्रिकेटप्रेमींसाठी संस्मरणीय ठरला. स्पर्धेतील रोमांच, विक्रम, नवोदित खेळाडूंचा उदय आणि अनुभवी खेळाडूंची चमक यामुळे हा हंगाम विशेष ठरला. ट्रॉफी जिंकणाऱ्या संघाच्या यशाची चर्चा सुरू असतानाच बक्षीस रकमेचाही मोठा विषय ठरला आहे. कोट्यवधी रुपयांच्या पुरस्कारांमुळे आयपीएल ही जगातील सर्वात श्रीमंत आणि लोकप्रिय क्रिकेट लीग असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. पुढील हंगामात आणखी मोठा थरार आणि नव्या विक्रमांची चाहत्यांना आतापासूनच उत्सुकता लागली आहे.

# 'डॉन ३' वाद चिघळला; रणवीरच्या समेटाच्या प्रयत्नांनाही नकार

**वृत्तसंस्था :** अभिनेता रणवीर सिंह सध्या 'डॉन ३' चित्रपटाशी संबंधित वादामुळे चर्चेत आहे. चित्रपटातून बाहेर पडल्याच्या चर्चांनंतर आता या वादाला नवे वळण मिळाले आहे. विविध माध्यमांतील वृत्तांनुसार, रणवीर सिंहने दिग्दर्शक फरहान अख्तर यांच्याशी मतभेद मिटवण्याचा प्रयत्न केला. तसेच जोया अख्तर यांच्यासोबत पुन्हा काम करण्याची इच्छाही व्यक्त केली. मात्र या दोन्ही प्रस्तावांना अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याची चर्चा चित्रपटसृष्टीत रंगली आहे. 'डॉन ३' हा हिंदी चित्रपटसृष्टीतील बहुचर्चित प्रकल्प मानला जातो. या चित्रपटात प्रमुख भूमिकेसाठी रणवीर सिंहची निवड झाल्याची घोषणा झाल्यानंतर चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र काही काळानंतर रणवीरने हा प्रकल्प सोडल्याच्या बातम्या समोर आल्या आणि त्यानंतर वादाला सुरुवात झाली. निर्माते आणि दिग्दर्शकांकडून याबाबत नाराजी व्यक्त करण्यात आल्याचे वृत्त आहे. माध्यमांमध्ये आलेल्या माहितीनुसार, रणवीर सिंहने अलीकडेच फरहान अख्तर यांच्यासमोर समेटाचा प्रस्ताव ठेवला होता. भविष्यात दुसऱ्या एखाद्या चित्रपटात एकत्र काम करण्याची तयारी दर्शवत त्यांनी संबंध सुधारण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले जाते. मात्र हा प्रस्ताव तत्काळ नाकारण्यात आल्याची चर्चा आहे. फरहान अख्तर यांचे व्यावसायिक भागीदार रितेश सिधवानी यांच्यापर्यंतही हा प्रस्ताव पोहोचविण्यात आला होता, असे बोलले जात आहे. याचबरोबर रणवीरने दिग्दर्शिका जोया अख्तर यांच्याशीही संपर्क साधल्याची माहिती समोर आली आहे. 'गली बॉय'सारख्या यशस्वी चित्रपटात या दोघांनी एकत्र काम केले होते. त्यामुळे पुन्हा एकदा एकत्र प्रकल्प करण्याची रणवीरची इच्छा होती. मात्र सध्याच्या परिस्थितीत जोया अख्तर यांनीही कोणतीही सकारात्मक भूमिका घेतली नसल्याचे वृत्त आहे. या संपूर्ण प्रकरणामागील नेमका वाद काय, याबाबत विविध तर्कवितर्क लावले जात आहेत. उपलब्ध माहितीनुसार, रणवीर सिंहने 'डॉन ३' प्रकल्पातून माघार घेतल्यामुळे निर्मात्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे. चित्रपटाच्या पूर्वतयारी, नियोजन, प्रचार आणि इतर प्रक्रियांवर मोठा



खर्च झाल्याने निर्मात्यांना कोट्यवधी रुपयांचा फटका बसल्याचे सांगितले जाते. यामुळेच निर्मिती संस्थेकडून कायदेशीर पर्यायांचा विचार करण्यात आल्याची चर्चा सुरू झाली. या वादामुळे चित्रपटसृष्टीतील अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. कारण रणवीर सिंह आणि अख्तर कुटुंबीयांमध्ये यापूर्वी चांगले व्यावसायिक संबंध असल्याचे मानले जात होते. दरम्यान, या प्रकरणात काही संघटनांच्या भूमिकेबाबतही चर्चा झाली. चित्रपटसृष्टीतील कामगार आणि तंत्रज्ञांच्या संघटनांनी या विषयावर लक्ष ठेवले असल्याचे वृत्त आहे. मात्र अधिकृत पातळीवर कोणती भूमिका घेण्यात आली आहे, याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध झालेली नाही. वादाच्या पार्श्वभूमीवर रणवीर सिंहच्या कारकिर्दीकडेही लक्ष वेधले जात आहे. गेल्या काही वर्षांत त्याने विविध प्रकारच्या भूमिका साकारत प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. ऊर्जावान अभिनय, वेगळी शैली आणि धाडसी भूमिका स्वीकारण्याची तयारी यामुळे त्याने हिंदी चित्रपटसृष्टीत वेगळी ओळख निर्माण केली आहे. अलीकडे प्रदर्शित झालेल्या त्याच्या चित्रपटांनीही चांगली कामगिरी केल्याचे सांगितले जाते. त्यामुळे वाद सुरू असला तरी त्याच्या लोकप्रियतेत कोणतीही घट झालेली दिसून येत नाही. उलट त्याच्या आगामी चित्रपटांविषयी चाहत्यांमध्ये उत्सुकता कायम आहे. सध्या रणवीर सिंहच्या आगामी प्रकल्पांबाबतही चर्चा सुरू आहे. काही वृत्तांनुसार तो पुन्हा एकदा दिग्दर्शक अदित्य धर यांच्यासोबत नव्या चित्रपटात काम करू शकतो. मात्र याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. तसेच दिग्दर्शक जय मेहता यांच्या एका नव्या चित्रपटातही रणवीर दिसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांचे निधन; भारतीय संगीत विश्वावर शोककळा!

**वृत्तसंस्था :** भारतीय संगीत विश्वातील ज्येष्ठ आणि ख्यातनाम पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी मुंबईतील राहत्या घरी निधन झाले. वाढत्या वयाशी संबंधित आरोग्य समस्यांमुळे त्यांनी लोखंडवाला येथील निवासस्थानी अखेरचा श्वास



घेतला. त्यांच्या निधनाने हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीसह संपूर्ण संगीत क्षेत्रावर शोककळा पसरली असून एका सुवर्ण संगीत पर्वाचा अंत झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. आपल्या मधुर, मखमली आणि भावपूर्ण आवाजाच्या बळावर त्यांनी अनेक दशकांपर्यंत रसिकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवले. त्यांच्या गायकीने भारतीय संगीताला एक वेगळी उंची मिळवून दिली. संगीत क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानाची दखल घेत केंद्र सरकारने त्यांना २०२३ मध्ये पद्मभूषण या देशातील प्रतिष्ठित नागरी सन्मानाने गौरविले होते. सुमन कल्याणपूर यांनी जवळपास सहा दशकांहून अधिक काळाच्या कारकिर्दीत हिंदी, मराठी, भोजपुरी तसेच विविध प्रादेशिक भाषांतील ८०० हून अधिक चित्रपट गीतांना आपला आवाज दिला. "आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे", "ना ना करते प्यार तुम्हीं से" आणि "तुमने पुकारा और हम चले आए" यांसारखी त्यांची अनेक गाणी आजही रसिकांच्या ओठांवर आहेत. विशेषतः मोहम्मद रफी यांच्यासोबत त्यांनी गायलेली अनेक द्वंद्वगीते भारतीय चित्रपटसंगीताच्या इतिहासातील अजरामर ठेवा मानली जातात. त्यांच्या स्वरांमध्ये असलेली सहजता, भावस्पर्शी अभिव्यक्ती आणि सुरेलपणा यामुळे त्या अनेक पिढ्यांच्या आवडत्या गायिका बनल्या. त्यांच्या निधनामुळे संगीत क्षेत्राने एक अनमोल रत्न गमावले असले तरी त्यांनी गायलेल्या असंख्य गीतांच्या माध्यमातून त्यांचा सुरेल वारसा कायम जिवंत राहणार आहे. संगीतप्रेमी आणि कलाविश्वाकडून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# उच्च रक्तदाबावर नियंत्रण हवे? जीवनशैलीतील 'हे' ९ बदल ठरतील प्रभावी

**वृत्तसंस्था :** उच्च रक्तदाब म्हणजेच वाढलेला रक्तदाब हा आजच्या काळातील सर्वात सामान्य आणि धोकादायक आरोग्य समस्यांपैकी एक मानला जातो. बदलती जीवनशैली, तणाव, अयोग्य आहार, शारीरिक हालचालींचा अभाव आणि व्यसनाधीनता यामुळे या आजाराचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे.

■ सर्वप्रथम संतुलित आणि पौष्टिक आहाराकडे लक्ष देणे आवश्यक आहे. आहारामध्ये ताजी फळे, हिरव्या भाज्या, कडधान्ये, संपूर्ण धान्ये आणि कमी चरबीयुक्त पदार्थांचा समावेश केल्यास रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते. विशेषतः पोटॅशियमयुक्त पदार्थ शरीरातील अतिरिक्त सोडियमचे प्रमाण कमी करण्यास सहाय्यक ठरतात. केळी, संत्री, टोमॅटो, पालक, काकडी आणि डाळी यांचे नियमित सेवन फायदेशीर मानले जाते.

■ दुसरा महत्त्वाचा बदल म्हणजे मीठाचे प्रमाण कमी करणे. जास्त मीठ खाल्ल्याने शरीरात पाणी साठते आणि रक्तवाहिन्यांवर अतिरिक्त ताण निर्माण होतो. त्यामुळे रक्तदाब वाढतो. तज्ज्ञांच्या मते, प्रक्रिया केलेले पदार्थ, चिप्स, नमकीन आणि पॅकेजबंद खाद्यपदार्थांमध्ये सोडियमचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे अशा पदार्थांचे सेवन मर्यादित ठेवणे आवश्यक आहे.

■ नियमित शारीरिक व्यायाम हा रक्तदाब कमी करण्याचा सर्वात प्रभावी नैसर्गिक उपाय मानला जातो. दररोज किमान ३० ते ४५ मिनिटे चालणे, धावणे, सायकल चालवणे, पोहणे किंवा योगाभ्यास केल्यास हृदयाचे आरोग्य सुधारते. व्यायामामुळे रक्ताभिसरण सुरळीत राहते आणि रक्तवाहिन्यांवरील ताण कमी होतो.

■ वजन नियंत्रणात ठेवणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. वाढते वजन, विशेषतः पोटाभोवती साचलेली चरबी, उच्च रक्तदाबाचा धोका वाढवते. शरीराच्या वजनात अगदी ५ ते १० टक्के घट झाली तरी रक्तदाबात सकारात्मक बदल दिसून येऊ शकतो. संतुलित आहार आणि नियमित व्यायामाच्या मदतीने वजन नियंत्रणात ठेवणे शक्य होते.

■ मानसिक तणाव हा उच्च रक्तदाब वाढवणारा आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. कामाचा ताण, आर्थिक चिंता, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि झोपेची कमतरता यामुळे शरीरात तणाव निर्माण करणाऱ्या संप्रेरकांचे प्रमाण वाढते. त्यामुळे ध्यान, योग, प्राणायाम, संगीत ऐकणे किंवा आवडत्या छंदांमध्ये वेळ घालवणे यांसारख्या उपायांचा अवलंब करणे फायदेशीर ठरते.

■ पुरेशी झोप घेणे हा देखील रक्तदाब नियंत्रणाचा महत्त्वाचा आधार आहे. अनेक लोक व्यस्त जीवनशैलीमुळे झोपेकडे दुर्लक्ष करतात. मात्र दररोज सात ते आठ तासांची गुणवत्तापूर्ण झोप शरीरातील विविध जैविक प्रक्रिया संतुलित ठेवण्यास मदत करते. अपुरी झोप रक्तदाब वाढवू शकते आणि हृदयाच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम करू शकते.

■ धूम्रपान पूर्णपणे बंद करणे हा आणखी एक महत्त्वाचा उपाय आहे. तंबाखूमधील घातक रसायने रक्तवाहिन्यांना हानी पोहोचवतात आणि रक्तदाब वाढवतात.

■ मद्यपानावर नियंत्रण ठेवणे देखील गरजेचे आहे. मद्याचे अतिसेवन केल्यास रक्तदाब वाढू शकतो तसेच हृदयाची कार्यक्षमता कमी होऊ शकते. तज्ज्ञांच्या मते, मद्यपान टाळणे किंवा मर्यादित ठेवणे हे दीर्घकालीन आरोग्यासाठी फायदेशीर ठरते.

■ रक्तदाबाची नियमित तपासणी करणे हा नववा आणि तितकाच महत्त्वाचा उपाय आहे. अनेकांना रक्तदाब वाढल्याचे समजतच नाही. त्यामुळे नियमित तपासणीमुळे समस्या लवकर ओळखता येते आणि वेळेवर उपचार सुरू करता येतात. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधे घेणे आणि उपचारांमध्ये सातत्य राखणे देखील आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग,
वरळी, मुंबई - ४०० ०१८.

Email :- centralmumbai.ee@mahapwd.gov.in | ☎ ४९३६४०४/२४९३१९०२ फॅक्स २४९३१९०२
जा.क्र.का.अ./ममुंवि/ई-निविदा/ २२९५ | दिनांक :- २६/०५/२०२६

ई निविदा सूचना क्रमांक ०४ सन २०२६-२७

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ सदर कामासाठी असलेल्या निविदा अटी व शर्ती प्रमाणे पात्रता प्राप्त अनुभवी कंत्राटदाराकडून "बी-२" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | वरळी, मुंबई येथील डॉ. ॲनी बेझंट मार्गावर नवीन धर्मादाय आयुक्त भवन (२ तळघर + तळ मजला व पहिला मजला + दुसरा मजला ते पाचवा मजला पोडीयम + सहावा मजला ते एकोणवीस मजले) बांधकाम करणे. | ४४.३० |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी- | दिनांक ०१/०६/२०२६ रोजी १५.०० वाजता ते दिनांक १५/०६/२०२६ रोजी १५.०० पर्यंत |
| ई-निविदा पुर्व बैठक- | दिनांक ०८/०६/२०२६ रोजी दुपारी १५.०० वाजता (मुख्य अभियंता, मुंबई सा.बां. प्रादेशिक विभाग, मुंबई ४ था मजला,बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई यांच्या दालनात) |
| ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) - | दिनांक १६.०६.२०२६ रोजी १५.०० वाजता (अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां) मंडळ विभाग, यांचे कार्यालय, ५ वा मजला,बांधकाम भवन,फोर्ट,मुंबई) |

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.gov.in 2. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

कार्यकारी अभियंता,
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग,
वरळी, मुंबई.

आरओसी - 2026-27/क्र- 5/C९८६

# ठाणे गुन्हे शाखेचा धडाका एमडी तस्करीच्या रॅकेटला खारीगावातच ब्रेक

**■ठाणे (विशेष प्रतिनिधी) :** अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात ठाणे गुन्हे शाखेने पुन्हा एकदा दमदार कारवाई करत ड्रग्ज माफियांना मोठा दणका दिला आहे. गुन्हे शाखा, घटक-१ च्या पथकाने खारीगाव टोलनाका परिसरात सापळा रचून ७० लाख रुपये किमतीचा ५००.०५ ग्रॅम एमडी (मेफेड्रॉन) ड्रग्ज, एक देशी बनावटीचे पिस्तूल, एक जिवंत काडतूस आणि दोन दुचाकी असा एकूण ७७ लाख ५५ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलीस शिपाई सागर सुरळकर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या




मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने खारीगाव टोलनाक्यावर सापळा लावून रहमान अब्दुल खान (२३), सिद्धांत संजय तांबोली (३१) आणि साहील नसीम खान (१८) यांना ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्यांच्या ताब्यातून मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्ज आणि शस्त्रसाठा आढळून आला. या प्रकरणी कळवा पोलीस ठाण्यात एनडीपीएस ॲक्ट व आर्म्स ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना २ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. तपासात हे अंमली पदार्थ विक्रीसाठी ठाणे परिसरात आणण्यात आल्याचे उघड झाले आहे. ही उल्लेखनीय कारवाई पोलीस उपआयुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमित यादव, पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शिरसाठ, तसेच अविनाश पाटील, संदीप महाडिक, नंदकुमार पाटील, धनंजय आहेर, मुकुंद आव्हाड, शशिकांत सावंत, दिपाली जाधव, अमोल ढावरे, प्रशांत लवटे, मयुर लोखंडे आणि सागर सुरळकर यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. ठाणे गुन्हे शाखेच्या या धडक कारवाईमुळे ड्रग्ज तस्करांचे धाबे दणाणले असून अंमली पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात पोलिसांनी पुन्हा एकदा आपली कडक भूमिका अधोरेखित केली आहे.

# निवासी इमारतीमधील 'ड्रग्ज फॅक्टरी'चा पर्दाफाश

**■मुंबई (विशेष प्रतिनिधी) :** आग्रीपाडा परिसरातील एका निवासी इमारतीतील फ्लॅटमध्ये सुरू असलेल्या एमडी (मेफेड्रोन) ड्रग्ज निर्मितीच्या बेकायदा प्रयोगशाळेचा अंमली पदार्थ विरोधी पथकाने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत एका महिलेसह तिघांना अटक करण्यात आली असून सुमारे ५० कोटी ७४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये मोठ्या प्रमाणातील एमडी ड्रग्ज, त्याच्या निर्मितीसाठी लागणारे रसायने व उपकरणे, तसेच एक देशी बनावटीचे पिस्तूल आणि १९ जिवंत काडतुसे यांचा समावेश आहे. मोहम्मद शोएफ शौकतअली मन्सुरी, सुफीयान सलीम मन्सुरी आणि मामूनी सुनिल सरकार अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. कांदिवली युनिटच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाला आग्रीपाडा परिसरात एका फ्लॅटमध्ये एमडी ड्रग्ज तयार केले जात असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत जगदाळे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने यास्मिन टॉवरमधील दहाव्या मजल्यावरील फ्लॅटवर छापा टाकला. छाप्यादरम्यान पोलिसांना फ्लॅटमध्ये अत्याधुनिक उपकरणांच्या साहाय्याने एमडी ड्रग्ज तयार केले जात असल्याचे आढळून आले. घटनास्थळावरून १४ किलो ४९३ ग्रॅम एमडी ड्रग्ज, कच्चा माल, रसायने आणि प्रयोगशाळेतील साहित्य जप्त करण्यात आले. याशिवाय एक देशी बनावटीचे पिस्तूल आणि १९ जिवंत काडतुसेही हस्तगत करण्यात आली. तपासात मामूनी सरकार ही मूळची कोलकात्याची रहिवासी असून तिने संबंधित फ्लॅट दरमहा ५० हजार रुपयांनी भाड्याने घेतल्याचे समोर आले आहे. गेल्या तीन महिन्यांपासून या ठिकाणी एमडी ड्रग्जची निर्मिती सुरू होती. मोहम्मद शोएफ आणि सुफीयान हे दोघेही या कामात तिला मदत करत असल्याचे तपासातून निष्पन्न झाले आहे. या तिघांविरुद्ध एनडीपीएस कायदा तसेच आर्म्स ॲक्टअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटकेनंतर त्यांना किल्ला न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली. आरोपींकडून ड्रग्ज पुरवठा साखळी, आर्थिक व्यवहार आणि या रॅकेटमागील इतर साथीदारांबाबत चौकशी सुरू असून तपासातून आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# चाणजेत हातभट्टीवर धाड; ५९ हजारांचा मुद्देमाल जप्त

**■उरण (विशेष प्रतिनिधी) :** नवी मुंबई गुन्हे शाखा कक्ष २ च्या पथकाने उरण तालुक्यातील चाणजे गाव येथे अवैध हातभट्टीवर धडक कारवाई करत दोन तासांच्या अंतराने दोन वेगवेगळे गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईत ५९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ६२ वर्षीय हिरामण काशिनाथ म्हात्रे याला दोन्ही गुन्ह्यांत आरोपी करण्यात आले आहे. पहिली कारवाई दिनांक २९ मे २०२६ रोजी सायंकाळी ६:३० वाजता करण्यात आली. रवि दामोदर म्हात्रे यांच्या मालकीच्या जागेत, चाणजेगाव येथे हिरामण काशिनाथ म्हात्रे हा गावठी दारू गाळताना रंगेहाथ सापडला. याप्रकरणी उरण पोलीस ठाण्यात गु.र.नं. ११५७/२०२५ महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई), ६५(फ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. घटनास्थळावरून २०० लिटर क्षमतेचे ८ निळे ड्रम, त्यात गूळ-पाणी मिश्रित अंदाजे २०० लिटर द्रावण, अल्युमिनीअमची टाकी, खुंडी, पातेले, लोखंडी स्टोव्ह, डिझेल कॅन व काळा गूळ असा एकूण ३२,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हिरामण म्हात्रे याने सदरचे काम रवि दामोदर म्हात्रे याच्या सांगण्यावरून करत असल्याची कबुली दिली. रवि म्हात्रे अद्याप फरार आहे. त्यानंतर अवघ्या दोन तासांनी, रात्री ८:४० वाजता त्याच जागेवर पुन्हा छापा टाकण्यात आला. यावेळी हिरामण म्हात्रे हाच अनिल म्हात्रे याच्या सांगण्यावरून दारू गाळताना आढळला.गु.र.नं. १५८/२०२६ अन्वये दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला. यावेळी २०० लिटरचे ७ ड्रम, गूळ-पाणी मिश्रित द्रावण, अल्युमिनीअम टाकी, स्टील टाकीचा लोखंडी स्टोव्ह, डिझेल कॅन व काळा गूळ असा २७,५०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. अनिल म्हात्रे फरार आहे. दोन्ही गुन्ह्यांमध्ये ७ वर्षांपेक्षा कमी शिक्षा असल्याने आरोपी हिरामण म्हात्रे याला बीएनएसएस ३५(३) नुसार नोटीस देऊन सोडण्यात आले. दोन्ही घटनास्थळी वपोनि अनिल पाटील, पोउपनिरी अभिजीत देशमुख व गुन्हे शाखेच्या पथकाने भेट दिली. सपोनि राजेश खांदवे हे तपास अधिकारी आहेत. एकाच रात्री, एकाच जागेवर, एकाच आरोपीला दोन वेगवेगळ्या मालकांसाठी दारू गाळताना पकडल्याने उरण तालुक्यातील अवैध धंद्यांचे जाळे पुन्हा चर्चेत आले आहे. गुन्हे शाखेच्या सलग कारवाईमुळे हातभट्टी चालकांचे धाबे दणाणले आहेत.

# पिंपरी-चिंचवडच्या दुर्घटनेनंतर वसई-विरार पोलीस सतर्क

## जंगलातील बेकायदेशीर हातभट्ट्या केल्या उद्ध्वस्त

**■वसई (विशेष प्रतिनिधी) :** पुणे येथील पिंपरी चिंचवड व हडपसर येथे विषारी दारूच्या सेवनामुळे १६ जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर मिरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालयाने धडक कारवाया सुरू केल्या आहेत. विरार गुन्हे शाखा कक्ष ३ व पेल्हार गुन्हेप्रकटीकरण शाखेच्या पथकाने दुर्गम जंगलांमध्ये सुरू असलेल्या दोन वेगवेगळ्या बेकायदेशीर हातभट्ट्यांवर छापे टाकून पोलिसांनी एकूण १ लाख ६९ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून तो नष्ट करण्यात आला आहे.या प्रकरणी दोन महिलांवर दारूबंदी कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पहिली कारवाई ही २९ मे २०२६ रोजी पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत वसई फाट्याजवळील रिचर्ड कंम्पाऊन्ड, मनिचा पाडालगतच्या



जंगलात अशीच कारवाई करण्यात आली. सहाय्यक फौजदार शिवाजी पाटील यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे, जंगलातील एका तात्पुरत्या शेडमध्ये चालणाऱ्या हातभट्टीवर छापा टाकण्यात आला. तेथून पोलिसांनी १ लाख ७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. येथीलही साधनसामग्री वाहून नेणे अशक्य असल्याने ती जागेवरच नष्ट करण्यात आली. तर दुसरी कारवाई ही ३० मे २०२६ रोजी विरार पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलींग सुरू असताना, पोलीस हवालदार सुनिल पाटील यांना बरफपाडा येथील जंगलात छुप्या पद्धतीने गावठी दारू तयार केली जात असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूराज रणवरे यांना याबाबत माहिती दिल्यानंतर, वरिष्ठांच्या सूचनेनुसार पोलीस पथकाने जंगलात छापा टाकला. या कारवाईत ६२ हजार ५० रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला. जंगलातील दुर्गम रस्ता आणि वाहतुकीची अडचण लक्षात घेता, तपासणी पुरते दारूचे नमुने काढून उर्वरित दारू, रसायन (वॉश), ॲल्युमिनियमच्या टाक्या आणि प्लास्टिक ड्रम पंचांसमक्ष जागीच नष्ट करण्यात आले असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या दोन्ही गावठी हातभट्ट्या कारवाया मध्ये १ लाख ६९ हजार किंमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला असून दोन महिलांच्या विरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नवी मुंबई सायबर पोलिसांची कामगिरी; ६१ लाखांच्या पॉलिसी फसवणुकीतील आरोपीला दिल्लीतून अटक

**■नवी मुंबई (विशेष प्रतिनिधी) :** 'भारती ॲक्सा' जीवन विमा पॉलिसी बंद करण्याच्या नावाखाली नागरिकाची तब्बल ६१ लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी नवी मुंबई सायबर पोलिसांनी दिल्लीतील जाफराबाद परिसरातून एका आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणात आंतरराज्यीय सायबर टोळीचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. दिनांक १ जुलै २०२५ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत आरोपीने फिर्यादीशी संपर्क साधून स्वतःला विमा कंपनीचा प्रतिनिधी असल्याचे भासवले. पॉलिसी बंद करण्याच्या प्रक्रियेच्या नावाखाली 'एजंट कोड', 'बीटीसी कोड', कागदपत्र प्रक्रिया आणि कॅश कन्व्हर्जन अशा विविध बहाण्यांनी वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास प्रवृत्त करण्यात आले. या कालावधीत फिर्यादीकडून एकूण ६१,४५,५८० रुपये इतकी रक्कम उकळण्यात आली. मात्र कोणतीही वैध प्रक्रिया पूर्ण न करता ही रक्कम परत न देता फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील संबंधित कलमांनुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली. तपासादरम्यान सायबर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपीचा मोबाईल क्रमांक आणि आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेतला. त्यातून आरोपीचे ठिकाण दिल्लीतील जाफराबाद परिसर असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पथकाने तेथे छापा टाकून शाहरूख मेहताब खान याला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने अन्य साथीदारांसोबत संगनमत करून कॉल सेंटर पद्धतीने नागरिकांना फसवण्याचे काम केल्याची कबुली दिली असून या कामाच्या मोबदल्यात त्याला आर्थिक लाभ मिळाल्याचेही स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात आणखी काही आरोपींचा सहभाग असल्याचा संशय असून त्यांचा शोध सुरू आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सहपोलीस आयुक्त दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त प्रमोद शेवाळे आणि पोलीस उपआयुक्त (गुन्हे) सचिन गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहाय्यक पोलीस आयुक्त धर्मपाल बनसोडे यांच्या निरीक्षणाखाली सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विशाल पाटील आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली. दरम्यान, विमा पॉलिसी बंद करण्याच्या नावाखाली अनोळखी कॉल, मेसेज किंवा ई-मेल आल्यास नागरिकांनी कोणतीही वैयक्तिक किंवा बँकिंग माहिती शेअर करू नये. अधिकृत ग्राहक सेवा केंद्राशी थेट संपर्क साधूनच खातरजमा करावी, असे आवाहन नवी मुंबई सायबर पोलिसांनी केले आहे.

# स्वयंघोषित मोडी भाईची पोलिसांनी जिरवली

**■कल्याण (विशेष प्रतिनिधी) :** कल्याण पश्चिमेकडील रोहिदास वाडा आणि आसपासच्या परिसरात स्वतःला भाई म्हणवून घेत नागरिकांमध्ये आणि तरुणांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या अभिषेक निंबोळकर उर्फ 'मोडी भाई'ची पोलिसांनी चांगलीच जिरवली आहे. निंबोळकरच्या मुसक्या आवळण्यात बाजारपेठ पोलिसांना यश आले आहे. परिसरात आपली दहशत कमी करण्यासाठी पोलिसांनी अटकेनंतर या तथाकथित भाईची भररस्त्यातून परेड काढली, ज्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वी अभिषेक निंबोळकर याने रोहिदास वाडा परिसरात काही स्थानिक




तरुणांना गाठून त्यांना थेट बंदुकीचा धाक दाखवला होता. "मी या परिसराचा भाई आहे, माझ्याबद्दल कोणीही काही बोलायचे नाही आणि माझ्या नादाला लागायचे नाही," अशी उघड धमकी त्याने दिली होती. या गुंडगिरीच्या आणि शस्त्राच्या वापरामुळे संपूर्ण परिसरात भीतीचे आणि तणावाचे वातावरण पसरले होते. नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती. या घटनेची माहिती मिळताच बाजारपेठ पोलिसांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणी शोधमोहीम आणि सापळे रचले होते. अखेर गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी अभिषेक निंबोळकर उर्फ मोडी भाईला शिताफीने अटक केली. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, अभिषेकचा इतर काही गुन्हेगारी कृत्यांमध्ये किंवा टोळ्यांमध्ये सहभाग आहे का, याचा कसून तपास केला जात आहे. त्याच्याकडे असलेल्या शस्त्राबाबतही पोलीस अधिक चौकशी करत आहेत. पोलिसांचा धाक राहावा म्हणून त्याची भरचौकातून परेड काढण्यात आली.

# अहिल्यानगरात आंदेकर टोळीचा मोठा कट उधळला; पाच जण अटकेत, पिस्तुले व शस्त्रसाठा जप्त

**■अहिल्यानगर (विशेष प्रतिनिधी) :** पुण्यातील कुख्यात आंदेकर टोळीचे जाळे आता केवळ पुण्यापुरते मर्यादित नसून त्याची व्याप्ती इतर जिल्ह्यांपर्यंत पोहोचल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. अहिल्यानगर शहरात मोठा दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या आंदेकर टोळीशी संबंधित पाच जणांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. या कारवाईत चार पिस्तुले, दहा जिवंत काडतुसे, कोयता, चाकू आणि इतर साहित्य असा सुमारे २ लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेला काही संशयित व्यक्ती शहरातील मिरावली पहाड परिसरात संशयास्पद हालचाली करत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. ही माहिती मिळताच पोलिसांनी अत्यंत गुप्तपणे सापळा रचून संबंधित ठिकाणी छापा टाकला. पोलिसांची चाहूल लागण्यापूर्वीच कारवाई करण्यात आल्याने संशयितांना पळून जाण्याची संधी मिळाली नाही. घटनास्थळी उपस्थित असलेल्या पाच जणांना ताब्यात घेऊन त्यांची झडती घेण्यात आली असता त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. अटक करण्यात आलेल्यांमध्ये मुश्ताक शेख, विराट मेहंदळे, समर्थ माडळकर, समर्थ दूधभाते आणि आकाश पवार यांचा समावेश आहे. प्राथमिक चौकशीत हे सर्वजण आंदेकर टोळीशी संबंधित असल्याचे समोर आले आहे. पोलिसांच्या मते, आरोपी शहरात गंभीर स्वरूपाचा गुन्हा किंवा दरोडा



टाकण्याच्या तयारीत होते. मात्र त्याआधीच पोलिसांनी त्यांचा कट उधळून लावला. झडतीदरम्यान आरोपींकडून चार पिस्तुले, दहा जिवंत काडतुसे, एक कोयता आणि एक चाकू जप्त करण्यात आला. याशिवाय काही रोख रक्कम आणि इतर साहित्यही पोलिसांच्या हाती लागले. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे २ लाख ७६ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणातील दोन आरोपी समर्थ माडळकर आणि समर्थ दूधभाते यांच्यावर यापूर्वीही पुणे शहरात गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. खुनाचा प्रयत्न, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका), बेकायदा शस्त्र बाळगणे तसेच इतर गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये त्यांचा सहभाग असल्याची नोंद आहे. त्यामुळे या आरोपींच्या अटकेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आंदेकर टोळीची दहशत अनेक वर्षांपासून पुणे शहरात चर्चेचा विषय राहिली आहे. टोळीतील अनेक प्रमुख सदस्य सध्या तुरुंगात असले तरी त्यांचे सहकारी आणि समर्थक विविध भागांत सक्रिय असल्याचा संशय पोलिसांना आहे. अहिल्यानगरातील कारवाईमुळे या टोळीचे जाळे पुण्याबाहेरही विस्तारल्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, आरोपी नेमका कोणता गुन्हा करण्याच्या तयारीत होते, त्यांना शस्त्रे कोठून मिळाली आणि त्यांच्या मागे आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा सखोल तपास सुरू आहे. जप्त करण्यात आलेल्या पिस्तुलांचा वापर यापूर्वीच्या कोणत्याही गुन्ह्यात झाला आहे का, याचीही तपासणी केली जात आहे. शस्त्रांचा पुरवठा करणाऱ्या साखळीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी स्वतंत्र तपास सुरू केला आहे. या कारवाईमुळे अहिल्यानगर शहरात संभाव्य मोठा गुन्हा टळल्याचे मानले जात आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या सतर्कतेमुळे आणि वेळेत मिळालेल्या गुप्त माहितीमुळे हा कट उधळण्यात यश आले. त्यामुळे पोलिसांच्या या कारवाईचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. सध्या सर्व आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असून त्यांची पोलीस कोठडी मिळवून अधिक चौकशी केली जात आहे. चौकशीतून आंदेकर टोळीच्या इतर सदस्यांबाबत, त्यांच्या हालचालींबाबत आणि संभाव्य गुन्हेगारी कारवायांबाबत महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, राज्यातील संघटित गुन्हेगारीविरोधातील मोहिम अधिक तीव्र करण्यात आली असून अशा टोळ्यांवर कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. अहिल्यानगरातील ही कारवाई संघटित गुन्हेगारीविरोधातील लढ्यातील महत्त्वाचे यश मानले जात असून पुढील तपासातून आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## संक्षिप्त

### गरीब नगरमधील कारवाईनंतर वांद्रे पूर्वेला मिळणार स्वतंत्र रिक्षा-बस मार्गिका

**मुंबई :** वांद्रे पूर्व रेल्वे स्थानक परिसरातील वाहतूक कोंडी आणि रिक्षांच्या गोंधळामुळे त्रस्त असलेल्या हजारो प्रवाशांसाठी महापालिकेने दिलासादायक योजना आखली आहे. वांद्रे पश्चिमेकडील यशस्वी प्रयोगाच्या धर्तीवर आता पूर्व भागातही स्वतंत्र रिक्षा मार्गिका आणि बस स्टँड उभारण्यात येणार आहे. नुकतीच 'गरीब नगर' परिसरातील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे हटविण्यात आल्यामुळे या भव्य प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जागा उपलब्ध झाली आहे. महापालिकेच्या 'एच-पूर्व' विभागाने हा महत्त्वाचा प्रस्ताव मंजुरीसाठी पालिकेचे वरिष्ठ अधिकारी आणि आयुक्त अश्विनी भिडे यांच्याकडे पाठवला आहे. या नव्या नियोजित सुविधेमुळे बीकेसी, म्हाडा कार्यालय, सरकारी वसाहत आणि भारतनगर या भागांत दररोज प्रवास करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा व पादचाऱ्यांचा त्रास कायमचा मिटणार आहे. मीटर आणि शेअर रिक्षांची मार्गिका वेगळी केल्यामुळे स्थानकाबाहेरील गर्दीचे व्यवस्थापन करणे सोपे होईल. आयुक्तांची अंतिम मंजुरी मिळताच, यंदाचा पावसाळा संपल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

### देशात येणार प्लास्टिकच्या नोटा?

**मुंबई :** डिजिटल व्यवहारांमध्ये मोठी वाढ झाली असली तरी देशातील रोख चलनाची मागणी कायम असल्याने भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) कागदी नोटांऐवजी प्लास्टिक अर्थात पॉलिमर नोटा चलनात आणण्याच्या प्रस्तावावर पुन्हा गंभीरपणे विचार करत आहे. सुमारे दहा वर्षांपूर्वी मांडण्यात आलेल्या या योजनेवर अलीकडेच पाटणा आणि मुंबई येथे झालेल्या आरबीआयच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या चर्चेनंतर लवकरच प्रायोगिक प्रकल्प (पायलट प्रोजेक्ट) सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जगातील अनेक देशांमध्ये पॉलिमर नोटांचा यशस्वी वापर होत असून त्या कागदी नोटांच्या तुलनेत अधिक टिकाऊ, सुरक्षित आणि दीर्घकाळ वापरता येण्यास सक्षम मानल्या जातात. त्यामुळे भारतातही अशा नोटांचा वापर सुरू करण्याचा पर्याय गांभीर्याने तपासला जात आहे.

### व्यावसायिक गॅस सिलिंडर पुन्हा महागला; वर्षातील सलग सातवी दरवाढ!

**मुंबई :** १ जून २०२६ पासून देशभरात १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमतीत पुन्हा वाढ करण्यात आली आहे. चालू वर्षात जानेवारीपासून आतापर्यंत झालेली ही सलग सातवी दरवाढ असल्याने हॉटेल व्यावसायिक, रेस्टॉरंट चालक तसेच छोटे खाद्यपदार्थ विक्रेते आर्थिक अडचणीत सापडले आहेत. नव्या दरानुसार मुंबईत व्यावसायिक गॅस सिलिंडरची किंमत ३,०६७.५० रुपयांवर पोहोचली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूच्या किमतींमध्ये झालेली वाढ तसेच मध्यपूर्वेतील भू-राजकीय तणावामुळे जागतिक पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. याच पार्श्वभूमीवर इंधन कंपन्यांवर दरवाढीचा दबाव वाढल्याचे मानले जात आहे. दरम्यान, घरगुती ग्राहकांसाठी दिलासादायक बाब म्हणजे १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. मुंबईत घरगुती सिलिंडरचा दर ९१२.५० रुपयांवर स्थिर ठेवण्यात आला आहे.

**१९ किलोच्या सिलिंडरच्या किमतीत झालेला बदल**

- जानेवारी : ₹. १११ ची वाढ
- फेब्रुवारी : ₹. ४९ की वाढ
- मार्च : ₹. १४४ ची वाढ
- एप्रिल : ₹. १९५.५० ची वाढ
- मे : ₹. ९९३ ची ऐतिहासिक मोठी वाढ
- १ जून २०२६ : पुन्हा सुमारे ₹. ४२ ते ₹. ५४ ची वाढ

# राज्यभरात एफडीएची मोठी मोहीम

## 'पतंजली' समूहाशी संबंधित दिव्य फार्मसीच्या औषधसाठ्यावर कारवाई

**मुंबई (राकेश गायकवाड) :** राज्यभरात ७ जिल्ह्यातील १२ आयुर्वेदिक औषधविक्री आस्थापनामध्ये धडक कारवाई करून ७३ लाख २४ हजार ६५६ रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. राज्यभरात आक्षेपार्ह जाहिराती असलेला व मिस ब्रँडेड औषध साठा जप्त करून कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा आस्थापनेला प्रशासनाकडून कोणतीही सवलत दिली जाणार नाही. भ्रामक व दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रसिद्ध करणे आणि अवैध औषध उत्पादन व विक्रीविरुद्धची कारवाई यापुढे अधिक कठोर आणि सातत्यपूर्ण असेल, असा स्पष्ट इशारा अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे. 'औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४०' व इतर अनुषंगिक कायदे व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात यापुढे थेट कायदेशीर न्यायालयीन कारवाई करण्यात येईल. सुरक्षित अन्न आणि औषध हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे आणि तो सुनिश्चित करणे हीच आमची मुख्य जबाबदारी आहे. ती आम्ही तत्परतेने व परिणामकारकरित्या पार पाडू" असे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी म्हटले आहे. कुठल्याही औषधांवर असलेल्या भ्रामक जाहिरातींवर विश्वास न ठेवता स्वतः च्या मनाने औषधांचे सेवन करू नये. सेल्फ मेडिकेशनमुळे आरोग्याच्या गंभीर समस्या उद्भवू शकतात, त्यामुळे अशा उत्पादनाबाबत प्रशासनाकडे तक्रार दाखल करावी, असे आवाहन आयुक्तांनी केली आहे. नागरिकांना तक्रार करणे सोपे व्हावे, यासाठी प्रशासनातर्फे लवकरच एक नवीन मोबाईल ॲप विकसित करण्यात येणार आहे,



तसेच एक टोल-फ्री क्रमांक (१८००२२२३६५) देखील कार्यान्वित करण्यात आला आहे. औषधांच्या दर्जाबाबत शंका असल्यास किंवा अवैध साठवणुकीची माहिती मिळाल्यास नागरिकांनी त्वरित एफडीएकडे तक्रार करावी. तक्रार करताना आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक तसेच संशयित आस्थापनेचा अचूक पत्ता आणि औषधाचे नाव स्पष्टपणे नमूद करावे. नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या सर्व तक्रारींची अत्यंत गोपनीयतेने पडताळणी करून तात्काळ कायदेशीर कारवाई केली जाईल, असे सह आयुक्त, (औषधे) गणेश. रा. रोकडे यांनी कळविले आहे. आयुक्त मुंढे यांनी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना जनतेच्या आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार बृहन्मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या विभागांमध्ये मोहीम राबवण्यात आली. 'औषधे व जादूटोणाविरोधी (आक्षेपार्ह जाहिराती) कायदा १९५४ चा भंग केल्याप्रकरणी विभागनिहाय कारवाईमध्ये मे. दिव्या फार्मसी, हरिद्वार (उत्तराखंड) या उत्पादकाच्या नागपूर (रु.७,२६,७५५), नाशिक (रु.७,१०,९४५), पुणे (रु.१४,६८,९८१), बृहन्मुंबई (रु. १,८५,६००), कोकण विभाग (रु.१८,५८,०००), अमरावती (रु.१,४२,२२९), छत्रपती संभाजीनगर (रु.४८७१८) औषधांचा नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी औषध निरीक्षकांच्या कारवाईत सदर साठा जप्त करण्यात आला. व पुणे विभाग येथील तपासणीदरम्यान आढळलेल्या ०२ एलोपथी मिसब्रँडेड औषधांचा तब्बल रु. २१,८३,४२८/- चा साठा सुद्धा जप्त करण्यात आला आहे.


**मे. दिव्या फार्मसी, हरिद्वार (उत्तराखंड) या उत्पादकाच्या औषधांचा औषध साठा जप्त**

- नागपूर - (रु.७,२६,७५५)
- नाशिक - (रु.७,१०,९४५)
- पुणे - (रु.१४,६८,९८१)
- बृहन्मुंबई - (रु. १,८५,६००)
- कोकण विभाग - (रु.१८,५८,०००)
- अमरावती - (रु.१,४२,२२९)
- छत्रपती संभाजीनगर - (रु.४८७१८)

# मध्य रेल्वेच्या जमिनीवर अतिक्रमणांचा विळखा

## १६ हजारांहून अधिक झोपड्यांनी व्यापली जागा!

**ठाणे (तृप्ती गोरे) :** वांद्रे पूर्वेतील गरीब नगर परिसरातील हजारो झोपड्यांवर नुकतीच मोठी कारवाई करण्यात आल्यानंतर आता मध्य रेल्वेच्या जागांवरील अतिक्रमणांचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मध्य रेल्वेच्या विविध विभागांमधील लाखो चौरस मीटर जमीन हजारो झोपड्या आणि अनधिकृत बांधकामांनी व्यापल्याचे समोर आले असून, याबाबत ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, मध्य रेल्वेच्या मालकीच्या ५ लाख चौरस मीटरहून अधिक जमिनीवर तब्बल १६ हजार ३० पेक्षा अधिक झोपड्या आणि इतर अनधिकृत बांधकामे उभी आहेत. कुर्ला-ट्रॉम्बे, कल्याण आणि डोंबिवली परिसरात अतिक्रमणांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे रेल्वेच्या नोंदीत नमूद करण्यात आले आहे. अनेक ठिकाणी रेल्वेच्या आरक्षित जागांवर झोपड्या, दुकाने, गाळे आणि इतर व्यावसायिक बांधकामे उभारण्यात आली आहेत. काही भागांत



रेल्वे रुळालगतच झोपड्यांची साखळी निर्माण झाल्याने सुरक्षेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. कुर्ला-ट्रोम्बे परिसरात सर्वाधिक ५,५९५ झोपड्यांनी सुमारे ५० हजार चौरस मीटरपेक्षा अधिक जमीन व्यापली आहे. तर कल्याणमध्ये ३,१६० झोपड्यांमुळे २.३५ लाख चौरस मीटरहून अधिक क्षेत्र अतिक्रमणाखाली गेले आहे. डोंबिवली परिसरात २,९०२ झोपड्यांनी जवळपास एक लाख चौरस मीटर जमीन व्यापली असून भायखळा, ऐरोली, कसारा, विक्रोळी आणि ठाणे परिसरातही मोठ्या प्रमाणात रेल्वे जमीन अतिक्रमणाखाली आहे. विशेष म्हणजे, भविष्यात अतिरिक्त रेल्वेमार्ग, स्थानक विस्तार आणि इतर महत्त्वाच्या विकासकामांसाठी राखीव ठेवलेल्या जागांवरच अतिक्रमणांचे जाळे वाढत असल्याने अनेक प्रकल्प रखडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. गरीब नगरमध्ये मोठ्या प्रमाणावर कारवाई करणारे प्रशासन रेल्वेच्या हजारो झोपड्यांबाबत मात्र अद्याप ठोस पावले का उचलत नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. रेल्वेच्या कोट्यवधी रुपयांच्या जमिनीवर वर्षानुवर्षे अतिक्रमणे वाढत असताना जबाबदार यंत्रणा नेमकी काय करत होती, याबाबतही चर्चा रंगली आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासन आणि संबंधित यंत्रणा या अतिक्रमणांवर व्यापक मोहीम राबविणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

- कुर्ला-ट्रॉम्बे : ५,५९५ झोपड्या
- कल्याण : ३,१६० झोपड्या
- डोंबिवली : २,९०२ झोपड्या
- भायखळा : ८०० झोपड्या
- ऐरोली : ७९४ झोपड्या
- कसारा : ५५९ झोपड्या
- घाटकोपर-विक्रोळी : ४१३ झोपड्या
- ठाणे : ३६५ झोपड्या

# बदलत्या राजकारणावर गवईंची रोखठोक टीका

## "वृत्तपत्राशिवाय कोण कोणत्या पक्षात आहे हे समजणे कठीण"

**अमरावती (महेश पानसरे) :** "सध्याच्या राजकारणात तत्त्वनिष्ठा, ध्येयनिष्ठा आणि विचारनिष्ठा कमालीची कमी झाली असून, प्रामाणिकपणा लोप पावत चालला आहे. राजकारणातील ९० टक्के नेते फक्त कोणत्या पक्षाचे सरकार येईल आणि कोण मंत्री बनेल, याचीच वाट पाहत असतात. सरकार बदलले की यांचे झेंडे, दांडे आणि हार लगेच तयार असतात," अशा रोखठोक शब्दांत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी सध्याच्या धरसोडीच्या राजकारणावर कडक प्रहार केला. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख आणि कोषाध्यक्ष दिलीप इंगोले यांच्या अमृतमहोत्सवी सोहळ्यात रविवारी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई होते. व्यासपीठावर खासदार बळवंत वानखडे, आमदार सुलभा खोडके, संजय खोडके यांच्यासह अनेक आजी-माजी लोकप्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनीही बदलत्या




राजकीय संस्कृतीवर मार्मिक भाष्य केले. "मी दिल्लीत असताना रोज महाराष्ट्रातील वृत्तपत्रे आवर्जून वाचायचो. कारण वृत्तपत्र वाचल्याशिवाय सध्या कोण कोणत्या पक्षात आहे, हे समजणेच कठीण झाले आहे," अशी टिप्पणी त्यांनी केली. तसेच, आपण कधीही विचारांशी तडजोड केली नाही किंवा जातीपातीचे राजकारण केले नाही, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना यशापयशाचा कानमंत्र देताना गडकरी म्हणाले की, "युद्धात पराभूत झालेला माणूस कधीच समाप्त होत नाही, परंतु युद्धभूमी सोडून पळून जाणारा मात्र संपल्याशिवाय राहत नाही." अनेक नेत्यांना आपण आधीचा पक्ष का सोडला आणि नव्या पक्षाने आपल्याला का घेतले, हेच समजत नाही, अशी टोलेबाजी त्यांनी केली. शेवटी, आज शिक्षण संस्थांमध्येही राजकारण शिरले असून याला कुठेतरी जनताही जबाबदार आहे, कारण 'जशी जनता असते, तसेच नेते तिला मिळतात', असे स्पष्ट मत गडकरींनी व्यक्त केले.

# गोपाळगडावरील खासगी मालकीचा वाद पेटला

## किल्ला शासकीय ताब्यात घेण्याची शिवप्रेमींची तीव्र मागणी

**रत्नागिरी (सचिन कदम) :** शिवकालीन इतिहासाची साक्ष देणाऱ्या गुहागर तालुक्यातील अंजनवेल येथील गोपाळगड किल्ल्यावरील खासगी मालकीचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित झालेल्या या ऐतिहासिक किल्ल्याची अंतर्गत जागा अद्याप खासगी मालकीत असल्याने ती महसूल व पुरातत्व विभागाच्या माध्यमातून शासनाच्या नावे करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी विधान परिषदेचे आमदार प्रमोद जठार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. दरम्यान, किल्ल्यात पडलेला आंबा उचलल्याच्या किरकोळ कारणावरून झालेल्या वादानंतर शिवप्रेमी आणि इतिहासप्रेमींनीही हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे. दाभोळ खाडीच्या मुखाशी वसलेला गोपाळगड किल्ला सागरी सुरक्षेच्या दृष्टीने शिवकालात महत्त्वाचा मानला जात होता. राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा प्राप्त असूनही किल्ल्याच्य आतील काही जमीन खासगी मालकीची असल्याचे वास्तव कायम आहे. त्यामुळे किल्ल्याच्या परिसरात कोणतेही बांधकाम अथवा स्वरूपात बदल करण्यास संबंधित व्यक्तींना अधिकार नसतानाही प्रत्यक्षात त्या जागेवर खासगी मालकीचा प्रभाव दिसून येत असल्याची भावना व्यक्त होत आहे. गतवर्षी किल्ल्याच्या परिसरात उभारण्यात आलेले अनधिकृत बांधकाम पुरातत्व विभागाने हटविले होते. मात्र किल्ल्याच्या आत असलेल्या आंबा बागायतीमुळे या जागेवर खासगी मालकीचे अस्तित्व अद्याप कायम असल्याचे चित्र आहे. अलीकडेच एका पर्यटकाने गोपाळगडाला भेट दिली असता किल्ल्याच्या परिसरातील पडलेला आंबा



उचलल्याने वाद निर्माण झाला. संबंधित जागेच्या मालकीचा दावा करणाऱ्या व्यक्तीने पर्यटकाला रोखत ही जमीन खासगी मालकीची असल्याचे सांगितले. त्यावर पर्यटकाने गोपाळगड हा राज्य संरक्षित स्मारक असून किल्ले खासगी मालकीचे असू शकत नाहीत, अशी भूमिका मांडली. या घटनेनंतर किल्ल्याच्या मालकीचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. गुहागर पंचायत समितीचे उपसभापती नीलेश सुर्वे यांनी गोपाळगडाची जमीन शासनाच्या नावे करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी आमदार प्रमोद जठार यांच्याकडे केली होती. त्यानुसार जठार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा सुरू केला आहे.दरम्यान, पंचायत समितीचे सभापती प्रणव पोळेकर यांनीही रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उद्योगमंत्री उदय सामंत यांना पत्र पाठवून गोपाळगडाची नोंद महाराष्ट्र राज्य पुरातत्व व महसूल विभागाच्या नावे करण्याची मागणी केली होती. ७/१२ उताऱ्यातील तांत्रिक त्रुटींमुळे किल्ल्याची नोंद काही स्थानिकांच्या नावे झाल्याचा दावा या पत्रात करण्यात आला आहे. राज्य संरक्षित स्मारक असलेली ही ऐतिहासिक वास्तू खासगी मालकी आणि वहिवाटीतून मुक्त होणे आवश्यक असल्याचेही त्यात नमूद करण्यात आले आहे. या मागणीची दखल घेत पालकमंत्री उदय सामंत यांनी विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर गोपाळगड शासनाच्या ताब्यात घेण्याच्या प्रक्रियेला गती दिली जाईल, तसेच याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे. गोपाळगडाच्या मालकीबाबतचा वाद पुन्हा समोर आल्याने ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी शासनाने निर्णायक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा इतिहासप्रेमी आणि स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# रेशन व्यवस्थेत मोठी डिजिटल क्रांती; 'सार्थक पीडीएस' योजनेला केंद्राची मंजुरी

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा) :** सार्वजनिक वितरण व्यवस्थेत (PDS) पारदर्शकता वाढवणे, गैरव्यवहारांना आळा घालणे आणि लाभार्थ्यांना अधिक सुलभ सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने 'सार्थक पीडीएस' (SARTHAK-PDS) योजनेला मंजुरी दिली आहे. सुमारे २५,५३० कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीसह राबविण्यात येणाऱ्या या योजनेमुळे देशातील ८१ कोटींहून अधिक रेशन कार्डधारकांना थेट लाभ मिळणार आहे. या योजनेअंतर्गत पारंपरिक रेशन दुकानांचे स्वरूप आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पूर्णपणे बदलले जाणार आहे. सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे 'धान्य एटीएम' संकल्पना. बँकांच्या एटीएमप्रमाणेच आता लाभार्थ्यांना रेशन कार्ड किंवा आधार क्रमांकाच्या माध्यमातून २४ तास धान्य उपलब्ध करून देण्याची व्यवस्था विकसित केली जात आहे. महाराष्ट्रातील नाशिक, ठाणे आणि नागपूर येथे या प्रणालीची प्रायोगिक अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि मशीन लर्निंगच्या मदतीने बनावट व दुबार रेशन कार्डांची ओळख पटविण्यात येणार असून, गोदामातून निघणाऱ्या धान्य वाहतूक वाहनांवर जीपीएस ट्रॅकिंग आणि डिजिटल लॉक बसवून काळाबाजार रोखण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या योजनेत 'डिजिटल फूड कूपन' आणि डिजिटल चलनावर आधारित ई-रुपी प्रणालीचाही समावेश करण्यात आला आहे. यामुळे लाभार्थ्यांच्या मोबाईल वॉलेटमध्ये थेट कूपन जमा होतील आणि क्यूआर कोड स्कॅन करून रेशन प्राप्त करता येईल. त्यामुळे कागदी रेशन कार्डांवरील अवलंबित्व कमी होणार आहे. याशिवाय दुर्गम भागातील नागरिक आणि रोजंदारीवर काम करणाऱ्या लाभार्थ्यांना वारंवार रेशन दुकानात जावे लागू नये म्हणून एकाच वेळी तीन महिन्यांचा रेशन कोटा उचलण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तक्रार निवारण व्यवस्थाही अधिक सक्षम करण्यात आली असून रेशन वेळेवर न मिळणे, कमी प्रमाणात मिळणे किंवा अन्य गैरप्रकारांबाबत नागरिकांना थेट व्हॉट्सॲप किंवा टोल-फ्री क्रमांकाद्वारे तक्रार नोंदवता येणार आहे. या डिजिटल सुधारणांमुळे रेशन वितरण अधिक पारदर्शक, वेगवान आणि नागरिक-केंद्रित होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बेवारस वाहनांबाबत अंधेरी पोलिसांचे महत्त्वाचे आवाहन

**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** विविध गुन्ह्यांमध्ये आणि कारवायांमध्ये जप्त करण्यात आलेली वाहने पोलीस ठाण्याच्या आवारात धूळ खात पडून राहिल्याचे अनेकदा पाहायला मिळते. सध्या अंधेरी पोलीस ठाण्याच्या आवारातही अशीच २१ दुचाकी वाहने जमा आहेत. ऊन, वारा आणि पावसामुळे या महागड्या मोटारसायकलींचे मोठ्या प्रमाणावर न भरून निघणारे नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर अंधेरी पोलिसांनी वाहनधारकांसाठी एक अत्यंत महत्त्वाचे आवाहन केले आहे. अंधेरी पोलीस ठाण्याकडून या सर्व २१ मोटारसायकलींच्या मूळ मालकांना सूचित करण्यात आले आहे की, त्यांनी आपली वाहने आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून पुढील १५ दिवसांच्या आत पोलीस ठाण्यातून घेऊन जावीत. पोलिसांनी स्पष्ट केले आहे की, दिलेल्या १५ दिवसांच्या मुदतीत जर मूळ मालकांनी वाहनांवर आपला हक्क सांगितला नाही, तर ही सर्व वाहने शासकीय कंत्राटदाराला (ठेकेदारास) विकली जातील. एकदा का या वाहनांची विक्री झाली, तर त्यानंतर त्या मोटारसायकलवर कोणाचाही दावा स्वीकारला जाणार नाही, याची गांभीर्याने नोंद घ्यावी. वाहनांच्या पडताळणीसाठी आणि ती परत मिळवण्यासाठी मूळ मालकांनी खालील पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्याशी संपर्क साधावा.

**बेवारस २१ दुचाकी वाहनांचे क्रमांक आणि प्रकार**

| वाहन क्रमांक – | वाहनाचा प्रकार |
|---|---|
| MH 02 EB 5177 - | HONDA DIO |
| MH 04 EF 6098 - | HONDA ACTIVA |
| MH 02 DV 6040 - | HONDA SHINE |
| MH 02 BC 8218 - | BAJAJ DISCOVER |
| MH 02 BB 7867 - | HONDA ACTIVA |
| MH 02 BH 0708 - | HONDA PASSION PRO |
| MH 03 AL 2802 - | BAJAJ PULSAR |
| MH 03 DN 8312 - | BAJAJ PULSAR |
| MH 03 CW 2727 – | HONDA ACTIVA |
| MH 02 DB 7185 - | HONDA ACTIVA |
| MH 02 CU 4824 - | HONDA ACTIVA |

| वाहन क्रमांक – | वाहनाचा प्रकार |
|---|---|
| MH 04 KH 8577 - | YAMAHA |
| MH 02 AE 6409 - | BAJAJ PULSAR |
| MH 48 AE 8784 - | HONDA ACTIVA |
| MH 04 CC 3341 - | HONDA DIO |
| MH 02 BX 8257 - | BAJAJ DISCOVER |
| MH 02 EY 9045 - | HONDA ACTIVA |
| MH 02 CQ 9838 - | HONDA DIO |
| MH 02 BL 4977 - | BAJAJ PULSAR |
| MH 02 FH 5179 - | BAJAJ PULSAR |
| MH 02 DB 8033 - | YAMAHA. |

- **श्री. सतिश कावणकर (पोलीस निरीक्षक)** – ९८२१६७१४६८
- **श्री. प्रशांत परीट (पोलीस शिपाई)** – ९१६७५७०८६९
- **श्री. किशोर शिंदे (पोलीस हवालदार)** – ९५९४९४५९११